# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ५ वे अंक ७२ शनिवार दि.२० सप्टेंबर २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## गोपीचंद पडळकरांच्या वादग्रस्त विधानावर मुख्यमंत्र्यांची पहिली प्रतिक्रिया म्हणाले आपण बोलत असताना.



भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे माजी प्रदेशाध्यक्ष आणि आमदार जयंत पाटील यांच्यावर अत्यंत खालच्या शब्दांत टीका केली आहे. या टीकेचे तीव्र पडसाद उमटायला सुरूवात झाली आहे. जयंत पाटील यांच्या वाळवा मतदार संघातील त्यांचे समर्थक चांगलेच आक्रमक झाले आहेत. पडळकरांच्या टीकेचा निषेध नोंदविला जात आहे. त्यांनी केलेल्या टीकेवर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

गोपीचंद पडळकर यांनी जे विधान केले ते योग्य आहे असे माझे अजिबातच मत नाही. वडिलांबद्दल किंवा परिवाराबद्दल बोलणे हे योग्य नाहीये. यासंदर्भात मी गोपीचंद पडळकरांसोबत बोललो आहे. अशाप्रकारच्या विधानांना आम्ही कधीच समर्थन करणार नाहीत, असं देखील फडणवीस म्हणाले आहेत. तसेच तुम्हाला भविष्यात चांगला नेता म्हणून मोठी संधी आहे. त्यामुळे आपण बोलत असताना त्याचे काय अर्थ निघत असतील याचा विचार करायला हवा, असा सल्ला गोपीचंद पडळकरांना दिला असल्याचं फडणवीसांनी सांगितलं.

गोपीचंद पडळकरांची खालच्या शब्दांत टीका माणसं पाठवली. कशासाठी? गोपीचंद पडळकरने कुठल्या व्यापाऱ्याकडून पैसे घेतले का? घ्या एखादा मधला व्यापारी घ्या आणि त्याच्यावर खंडणीचा गुन्हा दाखल करा. अरे जयंत पाटला तुझ्या सारखा भिकारी अवलाद गोपीचंद पडळकरची नाही. माझ्यात कार्यक्रम करायची ती धमक आहे. तुझ्यासारखी ती अवलाद नाही. एवढ्या खालच्या लेव्हलला? आता माझा दांडीयाचा कार्यक्रम आहे. ये बघायला.

तुझे डोळे दिपून जातील कार्यक्रम बघून, असं म्हणत आमदार गोपीचंद पडळकरांनी जयंत पाटील यांचा एकेरी उल्लेख केला आहे. याशिवाय जयंत पाटील यांच्या वडिलांचा उल्लेख करत जयंत पाटील हे राजारामबापू पाटील यांची औवलाद वाटत नाही, काही तरी गडबड आहे का? अशी अत्यंत खालच्या शब्दांत टीका पडळकरांनी केली आहे. यामुळे आता ते वादाच्या भोवऱ्यात सापडले आहेत.

## हाफिज सईदला भेटल्याबद्दल मनमोहन सिंगांनी माझे आभार मानले; यासिन मलिकचा धक्कादायक दावा

जम्मू आणि काश्मीर लिबरेशन फ्रंट (जेकेएलएफ) चा दहशतवादी यासिन मलिक याने एक खळबळजनक दावा केला आहे, ज्यामध्ये असा दावा करण्यात आला आहे की माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी २००६ मध्ये पाकिस्तानमध्ये भेटल्यानंतर लष्कर-ए-तैयबा (एलईटी) चा संस्थापक आणि २६/११ चा मास्टरमाइंड हाफिज सईद यांचे वैयक्तिक आभार मानले आणि त्यांचे आभार मानले. मलिक दहशतवाद निधी प्रकरणात जन्मठेपेची शिक्षा भोगत आहे. २५ ऑगस्ट रोजी दिल्ली उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेत मलिक यांनी, २००६ ची बैठक त्यांची स्वतःची नव्हती तर पाकिस्तानसोबतच्या गुप्त शांतता प्रक्रियेचा भाग म्हणून वरिष्ठ भारतीय गुप्तचर अधिकाऱ्यांच्या विनंतीवरून झाली होती. असा मोठा दावा त्यांनी केला आहे. गुप्तचर विभागाची कथित भूमिका यासिन मलिकच्या विधानानुसार, २००५ मध्ये काश्मीरमध्ये झालेल्या विनाशकारी भूकंपानंतर पाकिस्तानला भेट देण्यापूर्वी, गुप्तचर विभागाचे (आयबी) तत्कालीन विशेष संचालक व्ही.के. जोशी यांनी त्यांची दिल्लीत भेट घेतली. व्ही.के. जोशी यांनी मलिक यांना या संधीचा वापर करून तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या शांतता प्रयत्नांना पाठिंबा देण्यासाठी केवळ पाकिस्तानी राजकीय नेतृत्वासोबतच नव्हे तर सईदसह दहशतवादी व्यक्तींशीही संवाद साधण्याचे आवाहन केले होते. मलिक यांनी दावा केला की त्यांना स्पष्टपणे सांगण्यात आले होते की जर दहशतवादी नेत्यांनाही चर्चेत समाविष्ट केले नाही तर पाकिस्तानशी चर्चा फलदायी ठरेल. त्यांनी सांगितले की, विनंतीला प्रतिसाद म्हणून त्यांनी सईद आणि युनायटेड जिहाद कौन्सिलच्या इतर नेत्यांना पाकिस्तानमधील एका कार्यक्रमात भेटण्यास सहमती दर्शविली. भाजप आयटी सेलचे प्रमुख अमित मालवीय यांनी सोशल मीडिया पोस्टमध्ये यासिन मलिक यांनी दाखल केलेले प्रतिज्ञापत्र समाविष्ट केले. त्यांनी पोस्टमध्ये, दहशतवाद निधी प्रकरणात जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या जम्मू आणि काश्मीर लिबरेशन फ्रंट (जेकेएलएफ) चा दहशतवादी यासिन मलिकने धक्कादायक दावा केला आहे.असे म्हटले आहे. हाफिज सईदची भेट यासिन मलिक यांनी त्यांच्या प्रतिज्ञापत्रात हाफिज सईदने जिहादी गटांची एक परिषद कशी आयोजित केली याचे वर्णन केले आहे

## रेणापूर येथे नमो उद्यान विकसित करण्यासाठी आ. कराड यांच्या प्रयत्नातून एक कोटीचा निधी

लातूर : - रेणापूर येथे नमो उद्यान विकसित करण्यासाठी राज्यातील महायुती शासनाच्या नगर विकास विभागामार्फत लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून तब्बल एक कोटी रुपयाचा निधी मंजूर झाला असून सदरील निधी मंजूर करून दिल्याबद्दल आ. कराड यांचे रेणापूर येथील भाजपा कार्यकर्त्यांसह नागरिकांच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले आहे.



उत्कृष्ट उद्यान विकसित करून रेणापूर शहरातील नागरिकांना चांगल्या दर्जाचे उद्यान उपलब्ध व्हावे या उद्देशाने उद्यानास मंजुरी मिळावी त्यास निधी उपलब्ध व्हावा यासाठी लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी राज्याचे मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस साहेब आणि नगर विकास विभागाचे मंत्री तथा राज्याचे उपमुख्यमंत्री मा. एकनाथजी शिंदे साहेब यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा केला होता.

आ. रमेशआप्पा कराड यांनी केलेल्या पाठपुरावाला यश आले असून राज्य शासनाच्या नगर विकास विभागामार्फत १७ सप्टेंबर २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान योजनेअंतर्गत रेणापूर येथील उद्यानासाठी तब्बल एक कोटी रुपयाचा निधी मंजूर केला आहे.

गेल्या काही दिवसात राज्यातील महायुती शासनाच्या माध्यमातून रेणापूर येथील विविध विकास कामासाठी कोट्यावधी रुपयाचा निधी आ. रमेशआप्पा कराड यांनी उपलब्ध करून दिला त्यातून रेणापूरच्या सर्वांगीण विकासाला गती मिळाली असून नमो उद्यान विकसित करण्यासाठी मंजूर एक कोटी रुपयांच्या निधीतून अत्यंत चांगल्या दर्जाचे उद्यान विकसित केले जाणार आहे या उद्यानामुळे रेणापूरच्या विकासात निश्चितपणे भर पडणार आहे शिवाय सर्व स्तरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

उद्यान विकासासाठी एक कोटी रुपयाचा निधी रेणापूर नगरपंचायतीला मिळवून दिल्याबद्दल लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांचे प्रथम नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे, भाजपाचे चंद्रकांत कातळे, दिलीप आकनगिरे, विजय चव्हाण, दत्ता सरवदे, सुधीर तोडकरी, भाजपा शहराध्यक्ष अच्युत कातळे, भाजयुमो शहराध्यक्ष गणेश चव्हाण, संजय विरूळे, उज्वल कांबळे, राजकुमार आलापुरे, मनिषा मुंडे, दिनकर राठोड, उत्तम चव्हाण, महेश गाडे, संतोष राठोड, मारुफ आत्तार, उत्तम घोडके, लखन आवळे, दिलीप चव्हाण, शेख अजीम, अंतराम चव्हाण, शिवाजी भावे, हनुमंत भालेराव, गणेश माळेगावकर, रमा चव्हाण, अजय मारलापल्ले, रफिक शिकलकर, नंदकुमार बंडे, सचिन शिरसकर, विश्वनाथ उरगुंडे, जगन्नाथ कातळे, शरद चक्रे, सोपान सातपुते, निलेश उरगुंडे, सुरज फुलारी, अंकुश मोटेगावकर, मनोज चक्रे यांच्यासह भाजपा कार्यकर्त्यांनी व नागरिकांनी आभार व्यक्त केले आहे.

## लातूरग्रामीण मधील ४५ गावात दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून २ कोटी ७५ लाख मंजूर

लातूर : - लातूर जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा (दलित वस्ती सुधार) विकास करणे या योजनेअंतर्गत आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील ४५ गावातील ५० कामासाठी २ कोटी ७५ लक्ष रुपयाचा निधी मंजूर झाला आहे.

लातूर ग्रामीण मतदार संघातील विविध गावात दलित वस्ती सुधार योजनेच्या माध्यमातून विकास कामे व्हावी यासाठी लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी वेळोवेळी प्रयत्न केले त्यांच्या प्रयत्नातून जिल्हा नियोजन समिती अंतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा (दलित वस्ती सुधार) विकास करणे या योजनेअंतर्गत लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील ४५ गावातील ५० कामासाठी २ कोटी ७५ लक्ष रुपयाचा निधी मंजूर झाला आहे त्यात लातूर तालुका १ कोटी २१ लक्ष, रेणापूर तालुका १ कोटी २८ लक्ष ५० हजार आणि औसा तालुक्यातील भादा सर्कल करिता २६ लाख रुपयेचा निधी मंजूर झाला आहे. या निधीतून समाज मंदिर बांधकाम, पेव्हर ब्लॉक रस्ता, सिमेंट रस्ता, नाली बांधकाम, विद्युतीकरण करणे यासह विविध कामे केली जाणार आहेत.

लातूर ग्रामीण मतदार संघात दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत पुढील प्रमाणे गावनिहाय कामांना मंजुरी मिळाली आहे लातूर तालुका - उमरगा ७ लक्ष, शिवणी खु. ७ लक्ष, मळवटी ६ लक्ष, सेलू बु. ६ लक्ष, भातखेडा ३ लक्ष, एकुरगा ५ लक्ष, वाडीवाघोली ६ लक्ष, सोनवती ६ लक्ष, गाधवड ६ लक्ष, कारसा ५ लक्ष, गांजूर /ताडकी दोन कामे ५ लक्ष, जवळा बु. ६ लक्ष, बोडका ६ लक्ष, रामेगाव ६ लक्ष, तांदूळजा दोन कामे ६ लक्ष, सलगरा खु. ५ लक्ष, काटगाव ६ लक्ष, शिराळा ६ लक्ष, बिंदगीहाळ ५ लक्ष, गातेगाव ६ लक्ष, आणि चिंचोली ब. ६ लक्ष याप्रमाणे लातूर तालुक्यात १ कोटी २१ लक्ष रुपये मंजूर झाले आहेत.



रेणापूर तालुक्यातील आनंदवाडी ६ लक्ष, दवणगाव ७ लक्ष, गरसुळी ६ लक्ष, हरवाडी ६ लक्ष, कामखेडा ६ लक्ष, खरोळा ६ लक्ष, कुंभारी ६ लक्ष, कुंभारवाडी ६ लक्ष, लखमापूर ६ लक्ष, मोरवड ६ लक्ष, मोटेगाव ६ लक्ष, पानगाव दोन कामे १३ लक्ष, समसापूर ६ लक्ष, सांगवी दोन कामे १० लक्ष, सुमठाणा ६ लक्ष, वांगदरी ६ लक्ष, व्हटी नंबर १ दोन कामे ६ लक्ष, वाला ५ लक्ष, कारेपूर ६ लक्ष, दर्जी बोरगाव ३.५० लक्ष याप्रमाणे १ कोटी २८ लक्ष ५० हजार रुपये निधी मंजूर झाला आहे. तर औसा तालुक्यातील भादा सर्कल मधील भादा ७ लक्ष, बोरगाव न. ७ लक्ष, वडजी ५ लक्ष आणि वानवडा येथे ७ लक्ष याप्रमाणे एकूण २६ लक्ष रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.

लातूर ग्रामीण मतदार संघातील ४५ गावात ५० कामासाठी पावणेदोन कोटी रुपयांचा निधी मंजूर करून घेतल्याबद्दल लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांचे त्या त्या गावातील भाजपा कार्यकर्त्यांसह नागरिकांनी आभार व्यक्त केले आहेत.

## पडळकरांच्या टीकेचे तीव्र पडसाद; शरद पवारांचा थेट उच् फडणवीसांना फोन, म्हणाले बेताल वक्तव्य करणाऱ्यांना

भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे माजी प्रदेशाध्यक्ष आणि आमदार जयंत पाटील यांच्यावर अत्यंत खालच्या शब्दांत टीका केली आहे. या टीकेचे तीव्र पडसाद उमटायला सुरूवात झाली आहे. त्यांनी केलेल्या वक्तव्याचा तीव्र शब्दांत निषेध शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील नेत्यांनी नोंदविला असून, आता या प्रकरणी पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना फोन केला असल्याची माहिती समोर आली आहे. पडळकरांनी केलेल्या टीकेबद्दल पवारांनी मुख्यमंत्र्यांशी फोनवरून चर्चा केली आहे. फोनवरून शरद पवारांनी अशी टीका करणं योग्य नाही, बेताल वक्तव्य करणाऱ्यांना आवरा, असं थेट मुख्यमंत्र्यांना म्हटलं असल्याची माहिती मिळत आहे. जयंत पाटील यांच्यावर आणि त्यांच्या वडिलांबाबत अत्यंत हीन पद्धतीने केलेल्या विधानावर आमदार गोपीचंद पडळकर हे वादाच्या भोवऱ्यात सापडले आहेत.



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांनी देखील यावर भाष्य केलं आहे. राष्ट्रवादी पवार गटामध्ये मोठी नाराजी पडळकरांनी केलेल्या टीकेमुळे पसरली आहे, यामुळे प्रचंड आक्रोश निर्माण झाला आहे. ज्या खालच्या थराला जाऊन टीका होत आहे, ती काही महाराष्ट्राची संस्कृती नाही, असं म्हणत पवारांनी नाराजी व्यक्त केली. यामुळे आता या प्रकरणी मुख्यमंत्री काय भूमिका घेतात, याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.

गोपीचंद पडळकरांची खालच्या शब्दांत टीका माणसं पाठवली. कशासाठी? गोपीचंद पडळकरने कुठल्या व्यापाऱ्याकडून पैसे घेतले का? घ्या एखादा मधला व्यापारी घ्या आणि त्याच्यावर खंडणीचा गुन्हा दाखल करा.

अरे जयंत पाटला तुझ्या सारखा भिकारी अवलाद गोपीचंद पडळकरची नाही. माझ्यात कार्यक्रम करायची ती धमक आहे. तुझ्यासारखी ती अवलाद नाही. एवढ्या खालच्या लेव्हलला? आता माझा दांडीयाचा कार्यक्रम आहे. ये बघायला.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जीवनप्रवास प्रत्येकांसाठी प्रेरणादायी-अजित पाटील कव्हेकर

### मोदी यांच्या जीवनावर आधारीत माहितीपटास लातूरकरांचा उत्स्फुर्त प्रतिसाद







लातूर/प्रतिनिधीः- गुजरामधील वडनगर सारख्या छोट्याशा गावातून आपल्या जीवनप्रवासाची सुरुवात करणारे नरेंद्र दामोदरदास मोदी यांनी कठोर परिश्रम, ध्येयवेडेपणा आणि प्रामाणिकतेच्या बळावर देशाच्या पंतप्रधानपदापर्यंत पोहचविला आहे. पंतप्रधान मोदी यांचा जीवनप्रवास म्हणजे अशक्य गोष्ट शक्य होऊ शकते हे दाखवून देणारा असून देशासाठी आणि समाजासाठी सततचा विचार करणारे पंतप्रधान मोदी यांचा हा जीवनप्रवास देशातील प्रत्येकासाठी प्रेरणादायी असल्याचे मत भाजपा लातूर शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी व्यक्त केले.

लातूर येथील पिव्हीआर सिनेमागृहात दि. १८ सप्टेंबर पासून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जीवनावरील माहितीपट मोफत दाखविण्यात येत आहे. या माहितीपटाच्या शुभारंभाच्या प्रसंगी अजित पाटील कव्हेकर बोलत होते. यावेळी सेवा पंधरवाडा अभियानाचे संयोजक अमोल गिते, सहसंयोजक संजय गिर, रविशंकर लवटे, महिला मोर्चा अध्यक्षा रागिणी यादव आदींची प्रमुख उपस्थिती होती.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जन्म गुजरात मधील वडनगर सारख्या एका छोट्याशा गावात झाला असल्याचे सांगून अजित पाटील कव्हेकर म्हणाले की, मोदी यांना लहानपणापासूनच शिस्त आणि स्वाभिमान याची जाणीव होती. विशेष म्हणजे एका चहाविक्रेत्याचा मुलगा असुन सुद्धा त्यांनी अतिशय मोठा विचार करत आपण समाज आणि देशासाठी कांहीतरी देणे लागतो याची जाणीव ठेवत आपला जीवनप्रवास सुरु ठेवला होता. दुसर्यासाठी जगणे हा विचार डोळ्यासमोर ठेऊन राज्य आणि देशाच्या विकासाला सर्वोच्च प्राधान्य दिले होते. लहापणापासूनच समाजसेवेचे व्रत अंगीकरुन त्यांनी अनेकांसाठी त्यावेळीही मदतीचा हात पुढे केला असल्याचे या माहितीपटाच्या माध्यमातून आपल्यासमोर आले असल्याचे कव्हेकर म्हणाले.

ध्येयवेडेपणा आणि परिश्रम करुन त्याला प्रामाणिकतेची जोड दिल्यानंतर अशक्य गोष्ट शक्य होऊ शकते हे त्याना ज्ञात असल्यानेच त्यांनी गुजरात राज्याच्या मुख्यमंत्रीपदासह देशाच्या पंतप्रधानपदापर्यंत झेप घेतली असल्याचे अजित पाटील कव्हेकर यांनी सांगितले. सत्ता हे सेवेचे साधान आहे ही संकल्पना प्रत्यक्षात राबवून आज देशाची प्रतिमा अंतरराष्ट्रीय स्तरावर उंचाविण्याचे कामही त्यांच्या माध्यमातून झालेले आहे. त्यांच्या या जीवनप्रवासातील अनेक चढउतार आणि खडतर प्रंसग या माहितीपटाच्या माध्यमातून आपल्यासमोर आलेले असून त्यांचा हा जीवनप्रवास सर्वांसाठी प्रेरणादायी असून त्यांची समाजाप्रती असलेली जबाबदारी आणि देशप्रेम हे गुण आपण सर्वांनी अंगीकारावे असे आवाहन अजित पाटील कव्हेकर यांनी यावेळी केले.

पिव्हीआर सिनेमागृहात दाखविण्यात येणारा हा माहितीपट दि. २४ सप्टेंबर पर्यंत लातूरकरांसाठी मोफत उपलब्ध राहणार असून लातूर शहरासह परिसरातील नागरीक, विद्यार्थी यांनी याचा लाभ मोठ्या संख्येने घ्यावे असे आवाहन यावेळी करण्यात आले. माहितीपटाच्या सुरुवातीला भारतमातेच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन मंडल अध्यक्ष सुरेश जाधव यांनी केले. सदर माहितीपट पाहण्यासाठी पक्ष पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्यासह नागरीक व विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्त प्रतिसाद देऊन मोठी गर्दी केली होती.

# संपादकीय

## पक्षपाती कोण : अपील न्यायालय, की ट्रम्प?

अमेरिकेच्या फेडरल अपील कोर्टाने राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी लादलेले अनेक परस्पर आयात शुल्क रद्द केले आहे. हा निवाडा अर्थपूर्ण आहे. १२७ पानांच्या निकाल पत्रात न्यायालयाने असे सूत्र मांडले आहे की, आयात कर लादण्यासाठी राष्ट्राध्यक्षांनी आणीबाणी अधिकारात बेकायदेशीर अवलंब केला. भविष्यकाळात त्याचा काय परिणाम होईल, हे ऑक्टोबरनंतर कळू शकेल. पण तूर्त तरी ट्रम्प यांच्या धोरणाचे वस्त्रहरण करण्यात न्यायालयाला यश आले आहे, असे म्हणावे लागेल.

प्रा. डॉ. वि. ल. धारूरकर अमेरिकेच्या फेडरल अपील कोर्टाने ट्रम्प यांनी लादलेले अनेक परस्पर आयात शुल्क रद्द करत एक महत्त्वपूर्ण निवाडा केला. अमेरिकन न्यायव्यवस्था मुक्त आणि स्वतंत्र आहे. ती राष्ट्राध्यक्षांच्या विरोधातही निर्णय देऊ शकते, हे अपील कोर्टाने धाडसी निर्णयाने पुन्हा सिद्ध केले. परंतु, ही गोष्ट तेवढीच खरी की, अपिल न्यायालयातील नियुक्त सदस्यांपैकी बहुतांश सदस्य हे डेमोक्रॅटिक माजी राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांच्या काळात नेमलेले आहेत. त्यामुळे त्यांचा कल हा ट्रम्पविरोधी मत प्रकट करण्याकडे असणार, ही गोष्ट उघड आहे. असे असले तरी खंडपीठातील सात न्यायाधीशांनी ट्रम्पविरोधी निर्णय द्यावा, ही गोष्ट खरोखरच वाखाणण्यासारखी आहे. त्यांच्या या निर्णयाने अपील न्यायालयाच्या १२७ पानांच्या अहवालाबाबत जगभरामध्ये कुतूहल निर्माण झाले आणि त्यातून ट्रम्प यांची टॅरिफबाबतची भूमिका कशी एकांगी आणि पक्षपाती आहे, हे न्यायालयाने दाखविण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे ट्रम्प यांनी अधिकारांचा कसा गैरवापर केला आणि परस्परविरोधी आयात कर लावण्याचा धडाका लावला, त्यामुळे जगभरातील अर्थव्यवस्था हादरली, शेअर मार्केट कोसळले आणि लोकांच्या पुढे मंदीचे संकट उभे राहिले. अनेक देशांतील आयात– निर्यात उद्योग व्यवसायांना फटका बसला. परिणामी, सुरळीत सुरू असलेले अर्थचक्र पूर्णपणे विस्कटले.

ट्रम्प यांच्या 'अमेरिका प्रथम' या धोरणामुळे खुद्द अमेरिकेला तरी किती फायदा होतो, हा खरा प्रश्न आहे. टॅरिफ वादळानंतर अमेरिकेचे अर्थकारण घसरत आहे. तेथील ऊर्जा आणि गॅसचे दर ६ ते ८ टक्क्यांनी वाढले आहेत. अमेरिकेतील बाजारपेठेत वस्तूंची महागाई वाढत आहे आणि त्यात भरडला जात आहे तो सामान्य माणूस. अशा काही सामान्य माणसांनीच याचिका दाखल करून ट्रम्प यांचे हे टॅरिफ धोरण बेकायदेशीर असून आयात कर रद्द करावेत, अशी मागणी केली होती. अमेरिकेत ११ राज्यांत डेमोक्रेटिक प्रांतिक सरकारे आहेत, त्यांचा ट्रम्प यांच्या वाढीव टॅरिफ धोरणाला विरोध असणे साहजिक आहे.

ट्रम्प यांनी आणीबाणीच्या अधिकाराचा दुरुपयोग केला आणि अनेक देशांवर टॅरिफ लादले. ही शुल्क दरवाढ बेकायदेशीर असल्याचे न्यायालयाने म्हटले आहे. सबळ पुराव्यानिशी आणि प्रस्थापित कायद्यांचे विश्लेषण करून न्यायालयाने जो निवाडा दिला आहे, तो खरोखर विचार करायला लावणार आहे, तसाच तो धक्का देणारासुद्धा आहे. नवे टॅरिफ दर हे अध्यक्षांनी आणीबाणीच्या अधिकाराचा अतिरेकी दुरुपयोग करून वापरले आहेत, वाढविले आहेत, असे सूत्र न्यायालयाने मांडले आहे. अपील न्यायालयाचा युक्तिवाद असा आहे की, अमेरिका ज्या देशांशी व्यापार करते, त्या सर्व देशांबरोबर लादलेले तथाकथित परस्पर वाढीव आयात शुल्क देशांवर लादणे हेसुद्धा बेकायदेशीर आणि लोकशाही संकेताला धरून नाही.

अमेरिका स्वतंत्र झाली, तेव्हा पहिले राष्ट्राध्यक्ष जॉर्ज वॉशिंग्टन यांच्या काळात फक्त १० टक्के टॅरिफ लावला होता आणि पुढे दीर्घकाळ अनेक वर्षे म्हणजे १९६० पर्यंत तो तेवढाच राहिला. कुठल्याही अध्यक्षांनी हा १० टक्क्यांचा प्रमाण दर वाढविला नाही. पण ट्रम्प यांनी असा शोध लावला की, जगातील इतर देश आपल्या वस्तू व सेवा अमेरिकेच्या बाजारपेठेत विकत आहेत आणि त्यामुळे अमेरिकेतील उद्योग व्यवसायांवर विपरीत परिणाम होत आहे आणि स्थानिक उद्योजकांना त्यामुळे संधी मिळत नाही. आता ट्रम्प महोदय अमेरिकेतील उद्योजकांना स्वबळावर उभे करून त्यांना आपले उद्योग उभे करण्यासाठी सामर्थ्य देणार आहेत आणि बाहेरून येणार्या वस्तूंवर अधिकाधिक कर लादून त्यांची कोंडी करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. ते त्यांच्या 'अमेरिका प्रथम' या धोरणाचे सूत्र आहे. यासंदर्भात न्यायालयाने आपल्या प्रदीर्घ अहवालात अनेक सूक्ष्म बारकावे काळजीपूर्वक स्पष्ट केले आहेत आणि ट्रम्प यांच्या धोरणांतील विसंगतीवर नेमके बोट ठेवले आहे.

ट्रम्प यांना असे वाटते की, आपले व्यापार दर आंतरराष्ट्रीय संकेतानुसार आहेत आणि त्यामुळे कोणताही आंतरराष्ट्रीय नियमांचा भंग होत नाही, हा युक्तिवादही व्यापार न्यायालयाने फेटाळून लावला होता. लाभलेल्या आणीबाणीच्या अधिकारांतर्गत आपण टॅरिफ लावू शकतो, असे ट्रम्प यांचे म्हणणे होते. पण, आंतरराष्ट्रीय व्यापार न्यायालयाने त्यांचा हा युक्तिवादसुद्धा नाकारला. त्याचप्रमाणे अपील न्यायालयानेसुद्धा आता दिलेला निर्णय हा आंतरराष्ट्रीय व्यापार न्यायालयाची बाजू आणखी बळकट करणारा आहे, असे म्हटले पाहिजे. ट्रम्प यांनी प्राप्त होणार्या आर्थिक शक्ती कायद्याचा म्हणजे आय.ई.ई. पी.ए. याचा वापर करून वर्षाच्या प्रारंभी अव्वाच्या सव्वा लागू केलेल्या टॅरिफचे मूल्यमापन करून न्यायालयाने हा निर्णय दिला. ट्रम्प यांनी कार्यकारी अधिकारांचा अभूतपूर्व अतिरेक केला, असे न्यायालयाने अधोरेखित केले. त्यामुळे कर आणि शुल्क लादण्याचा अधिकार हा काँग्रेसला आहे, अध्यक्षांना नव्हे. ट्रम्प यांनी घेतलेला हा निर्णय चुकीचा आहे, असे या दस्तऐवजात म्हटले आहे.

दुसरीकडे अपेक्षेप्रमाणे ट्रम्प यांनी हा निर्णय पक्षपाती असल्याचे म्हटले आहे. अपील न्यायालयाने चुकीचा निर्णय दिला आहे. आमचे टॅरिफ काढून टाकले पाहिजेत, असे त्यांना वाटते. जर हे टॅरिफ कमी केले गेले तर ते देशासाठी एक संकट ठरेल. त्यामुळे देश आर्थिकदृष्ट्या कमकुवत होईल आणि आपल्याला त्यामुळेच मजबूत राहावे लागेल, असे ट्रम्प यांनी या निर्णयावर प्रतिक्रिया देताना नमूद केले. त्यांचा हा बागुलबुवा किती खरा मानावयाचा. ट्रम्प यांनी त्यांच्या व्यापक शुल्क धोरणाचा वापर केवळ जागतिक व्यापारांसाठी नव्हे, तर मित्र राष्ट्रांसोबतची युती आणि विरोधकांच्या असलेल्या संबंधांना आकार देण्यासाठी केला आहे.

# हे जनतेची आर्थिक लूट करत राहतील.

आपल्या राज्यात तोतयागिरी करून लोकांना फसवण्याचे प्रकार फार वाढलेले आहेत. तोतया अधिकारी बनून लोकांची आर्थिक लूट करण्याचा प्रयत्न करीत आहेत. अशीच मागे एकदा वाचण्यात आलेली बातमी आठवली .ती अशी की जिल्हाधिकारी असल्याचे भासवून बनला मुख्य अतिथी. झडतीत आढळली बोगस कागदपत्रे. हिंगोली : मी आयएएस झालेलो आहे. सध्या परिविक्षाधीन काळात आहे. अतिरिक्त जिल्हाधिकारी पदावर आहे. असे सांगून हिंगोलीतील पोद्दार इंटरनॅशनल स्कूलचा मुख्य अतिथी बनलेल्या तोतया विरुद्ध गुरुवार दिनांक १६ फेब्रुवारी २०२३ रोजी रात्री ८च्या सुमारास गुन्हा दाखल झाला आहे.

माहे डिसेंबर २०२२ मध्ये जळगाव जिल्ह्यातील जामनेर येथील अमोल वासुदेव पजई (वय वर्षे ३२ ) हिंगोलीत दाखल झाला. त्याने अनंता मधुकर कलोरे (वय ४२ राहणार मोठी उमरी तालुका जिल्हा अकोला ) व संदीप उर्फ इंद्रजीत एकनाथ (वय वर्षे ३४ राहणार सुराणानगर हिंगोली ) यांच्या मदतीने अतिरिक्त जिल्हाधिकारी या पदावर कार्यरत असल्याचे भासवून पोद्दार शाळेत दोन मुलां ॲडमिशन ही करून घेतले. मुलांच्या फार्म मध्येही हे पद नमूद केले. या पदावर असल्याने पोद्दार शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलनास हजेरी लावली. शाळेने निमंत्रित पत्रिकेत अगदी पहिलेच नाव छापून त्यांना प्रमुख पाहुणे केले.

पोलीस अधीक्षकांच्या सतर्कतेने प्रकार उघड . हा प्रकार आधी शाळेच्या लक्षात आला नव्हता. परंतु अमोल वासुदेव पजई पोलीस अधीक्षक जी.श्रीधर यांना भेटला. त्यांनाही आपण आयएएस अधिकारी असल्याची बतावणी केली.२०२० च्या बॅचचे असल्याचे सांगितले. अतिरिक्त जिल्हाधिकारी असून हिंगोलीत बदलीवर येणार असल्याचेही सांगितले .त्यामुळे त्यांनी ती यादी तपासली दिलेला कोड चेक केला तर तो झारखंड मधील अधिकाऱ्यांचा निघाला. गाडीतील कागदपत्रांनी फुटले बिंग. अमोल कडील महागड्या चारचाकीची तपासणी केली असता त्यात हिंगोली जिल्हा अधिकारी कार्यालयाचे लेटर पॅड ,एनटीसीतील अर्बन बँकेची कागदपत्रे ,भाडे कराराचे लेखी बाँड , पत्नीचे ओळखपत्र आढळले.

या ओळखपत्रावर गृह गव्हर्मेंट ऑफ इंडियन मिनिस्ट्री ऑफ फॉरेस्ट डिपार्टमेंट , तसेच नाव फॉरेस्ट रेंज ऑफिसर अशी संशयित कागदपत्रे आढळली असून या गाडीत तब्बल ५ लाख रुपयांची रोकड आढळली असून पोलिसांनी ही रोकड ताब्यात घेतले आहे .अमोल पजई अनंत कलोरे व संदीप पाचमासे या तिघांनाही पोलिसांनी ताब्यात घेतले आहे .अशा तोतयावर पोलिसांनी कठोर शिक्षा करावी. हा तोतया सापडला नसता तर त्याने आणखी अनेक लोकांना फसवून लोकांची आर्थिक लूट केली असती. यात पोलीस अधिकाऱ्यांच्या चाणाक्ष नजरेतून तो सुटू शकला नाही.

पण अशा तोतयांच्या बातम्या कमी की काय म्हणून आज दिनांक १९ सप्टेंबर २०२५ रोजी अशीच एक चकित करणारी बातमी वाचण्यात आली ती अशी की, कवठेमंकाळ येथील डॉक्टर दाम्पत्याला लुबाडणाऱ्या तोतया आयकर अधिकाऱ्याच्या टोळीला अटक. सांगली : कवठेमहांकाळ येथील डॉक्टर दापत्याला लुबाडणाऱ्या आयकर अधिकाऱ्यांच्या टोळीमधील तिघांना अटक करण्यात आली आहे. स्थानिक गुन्हा अन्वेषण विभाग पोलीस निरीक्षक सतीश शिंदे यांच्या नेतृत्वाखालील पोलीस पथकाने अवघ्या ४८ तासात या टोळीच्या मुसक्या आवळल्या. या टोळी कडून रोप १५ लाख रुपये एक किलो ४१० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने असा एकूण१ कोटी २० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

या टोळी मधील आणखी चौघेजण फरारी असून त्यांच्या शोधासाठी पोलीस पथके रवाना करण्यात आली आहेत. ही माहिती सांगली पोलीस अधीक्षक संदीप घुगे यांनी गुरुवारी पत्रकार बैठकीत दिली. त्यावेळी अतिरिक्त पोलीस अधीक्षक श्रीमती कल्पना बारवकर, जत उपविभागीय पोलीस अधिकारी सचिन थोरबोले ,सतीश शिंदे व कवठेमहांकाळ पोलीस ठाणे पोलीस निरीक्षक ज्योतीराम पाटील उपस्थित होते. अटक केलेल्यात दीक्षा राष्ट्रपाल भोसले ( वय वर्षे २५ राहणार काकडे पार्क ,बिल्डींग क्रमांक एफ वन पिंपरी –चिंचवड पुणे ) , पार्थ महेश मोहिते ( वय वर्षे २५ राहणार मंगळवार पेठ कोल्हापूर ) व साई दीपक मोहिते ( वय वर्ष २३ राहणार प्रगती नगर पाचगाव तालुका करवीर जिल्हा कोल्हापूर ) या तिघांचा समावेश आहे.

या टोळीमधील महेश शिंदे ( राहणार जयसिंगपूर जिल्हा कोल्हापूर सध्या रा.घाटकोपर , मुंबई ) ,अक्षय लोहार (राहणार संकेश्वर जिल्हा बेळगाव कर्नाटक ) , शकील पटेल राहणार गडहिंग्लज जिल्हा कोल्हापूर) व आदित्य मोरे ( राहणार रुकडी तालुका हातकणंगले जिल्हा कोल्हापूर ) असे चौघेजण फरारी आहेत . या चौघांचे शोधासाठी स्थानिक गुन्हा अन्वेषण विभाग व कवठे महांकाळ पोलीस ठाण्याकडील पोलीस पतके विविध भागात रवाना करण्यात आली आहेत. स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाकडील सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज पवार व नितीन सावंत यांच्या नेतृत्वाखाली पोलिस हवालदार स्वप्ना दराडे.

सागर लवटे ,नागेश खरात ,दरिबा बंडगर , सागर टिंगरे , संदीप नलावडे ,अमीरश फकीर, सतीश माने, संदीप गुरव, मच्छिंद्र बर्डे, उदयसिह माळी ,अनिल कोळेकर, अमर नरळे , आमसिद्धा खोत , सोमनाथ गुंडे , इम्रान मुल्ला, अतुल माने ,अमोल ऐदाळे , केरुबा चव्हाण व विक्रम खोत यांच्या पोलीस पथकाने ही कारवाई केली. या पोलीस पथकाला कवठेमहांकाळ पोलीस ठाणे सहायक पोलीस निरीक्षक दत्तात्रय कोळेकर, पोलीस उपनिरीक्षक विनायक मासाळ , पोलीस हवलदार नागेश मासाळ, सिद्धराम कुंभार ,अभिजीत कासार, शितल जाधव व स्वप्नील पाटील ,तर सायबर पोलीस ठाण्यातील सहायक पोलीस निरीक्षक रूपाली बोबडे ,पोलीस हवालदार अभिजीत पाटील ,

अजय पाटील ,अजय बेंद्रे व शांता कोळी या सर्वांचे विशेष सहकार लाभले. कवठे महांकाळ येथील डॉक्टर जगन्नाथ म्हेत्रे यांच्या निवासस्थानी आयकर विभागाचा छापा असल्याचा बनाव करून या तोतया टोळीने छापा टाकला होता .या छाप्यात या तोतया आयकर अधिकाऱ्यांनी एक किलोहून अधिक सोन्याचे दागिने व रोकड असे एकूण १ कोटी २० हजार रुपयांचा मुद्देमाल घेऊन धूम ठोकली होती. चित्रपट अभिनेता अक्षय कुमार यांच्या हिंदी चित्रपटातील स्पेशल २६ सारखा अगदी हुबेहूब छापा डॉक्टर जगन्नाथ म्हेत्रे यांच्या निवासस्थानी टाकण्यात आला होता. या घटनेने संपूर्ण सांगली जिल्ह्यात एकच खळबळ उडाली होती.

संदीप घुगे , श्रीमती कल्पना बारवकर व सचिन थोरबोले यांनी स्थानिक गुन्हा अन्वेंशन विभाग व कवठेमंकाळ पोलीस ठाणे यांची विविध पोलीस पथके कार्यरत केली होती. याचवेळी पुणे व कोल्हापूर जिल्ह्यातील चौघांनी हा बनावट छापा टाकल्याचे पोलीस तपासात स्पष्ट झाले होते. या माहिती आधारे स्थानक गुन्हा अन्वेषण विभागाकडे पोलीस पथकाने अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक विभाग पोलीस उपनिरीक्षक तेजस्वी पवार यांच्या मदतीने पिंपरी चिंचवड येथील दीक्षा भोसले हिला ताब्यात घेतली. दीक्षा भोसले हिच्या चौकशीत पार्थ मोहिते व साई मोहिते यांची नावे निष्पन्न झाली .त्यानुसार या पोलीस पथकाने या दोघांनाही हातकणंगलेतून ताब्यात घेतले .

व या दोघाकडून रोख १५ लाख रुपये सह १ किलो ४१० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने असा एकूण १ कोटी २० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. या सर्वांच्या सखोल चौकशीत या तिघांनीही अन्य चौघांच्या मदतीने डॉक्टर दांपत्याला लुटल्याची कबुली दिली आहे. या प्रकरणी पुढील अधिक तपासकामी या तिघांना कवठेमंकाळ पोलीस ठाण्याच्या स्वाधीन करण्यात आले आहे. या बातम्या वाचल्या नंतर कमी वेळेत कमी श्रमात जास्त पैसे कसे मिळतील याचाच प्रयत्न तोतयांनी केलेला आहे. अशा तोतया यांना कठोरात कठोर शिक्षा केली पाहिजे. नाहीतर हे जनतेची आर्थिक लूट करत राहतील.

**********

लेखक

जी.एस.कुचेकर पाटील

भुईंज तालुका वाई जिल्हा सातारा

मो.न. ७५८८५६०७६१

# अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, १९८९ अंतर्गत अटकपूर्व जामीनावरील बंदी : न्यायालयीन दृष्टीकोन

आपल्या भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला कलम १४ नुसार, राज्य कोणत्याही व्यक्तीला कायद्यापुढे समानता किंवा भारताच्या हद्दीत कायद्यांचे समान संरक्षण नाकारणार नाही. हे कलम सर्व व्यक्तींना, मग ते नागरिक असोत वा परदेशी, समानतेचा अधिकार देते आणि जात, वंश, धर्म, जन्मस्थान किंवा लिंगावर आधारित भेदभाव करण्यास मनाई करते, आणि कलम २१ नुसार, कायद्याने स्थापित केलेल्या प्रक्रियेशिवाय कोणत्याही व्यक्तीला त्याचे जीवन किंवा वैयक्तिक स्वातंत्र्य हिरावून घेतले जाणार नाही. हा मूलभूत अधिकार आहे, जो प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जगण्याचा हक्क देतो, आणि राज्याच्या अनियंत्रित कृतींपासून संरक्षण प्रदान करतो, आणि हा हमी स्वरूपात दिला आहे. तथापि, इतिहासातील जातीय दडपशाही, जातीय अहंकार, जातीय अस्पृश्यता व जातीय सामाजिक बहिष्कार यामुळे अनुसूचित जाती व जमाती या मानवीय घटकांवर विशेष अन्याय झालेला आहे. या ऐतिहासिक विषमतेच्या दुरुस्तीसाठी आणि वंचित समाजघटकांचे संरक्षण करण्यासाठी अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, १९८९ संसदेतून, हा कायदा ११ सप्टेंबर १९८९ रोजी भारतीय संसदेत मंजूर झाला आणि ३० जानेवारी १९९० रोजी अधिसूचित करण्यात आला. अनेक उपाययोजना करूनही, अनुसूचित जाती/अनुसूचित जमातींवर उच्च जातींच्या हातून विविध अत्याचार होत आहेत या निराशाजनक वास्तवाची ओळख देखील या कायद्याद्वारे करून दिलेली आहे. या कायद्याचा उद्देश केवळ गुन्ह्यांना शिक्षा करणे एवढाच नाही, तर जातीय दहशतीतून पीडितांना संरक्षण देणे व त्यांचा सन्मान व सुरक्षितता कायम ठेवणे हा आहे. या कायद्यातील एक महत्त्वाची तरतूद म्हणजे कलम १८ ज्यामध्ये स्पष्ट केले आहे की, भारतीय दंड विधान संहितेच्या (CrPC) कलम ४३८ आणि आता (भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३, कलम ४८२ ) मधील अटकपूर्व जामिनाच्या तरतुदीला लागू न होण्याबद्दल सांगते. याचा अर्थ, या कायद्यांतर्गत गुन्हा केल्याचा आरोप असलेल्या कोणत्याही व्यक्तीला अटकपूर्व जामीन मिळू शकत नाही, जरी न्यायालयाने तसा आदेश दिला असेल तरीही. हे कलम पीडितांना संरक्षण देण्यासाठी आणि खटला निष्पक्षपणे चालवण्यासाठी तयार केले गेले आहे.

अटकपूर्व जामीन म्हणजे काय ?

अटकपूर्व जामीन (-nticipatory Bail) हा एक विशेष कायदेशीर उपाय आहे, जो दंड प्रक्रिया संहितेत (CrPC – आता BNSS, कलम ४८२) अंतर्भूत आहे. याचा उद्देश म्हणजे गैरजामीनपात्र गुन्ह्यात अटक होण्याची शक्यता असल्यास, व्यक्तीने आगाऊपणे न्यायालयाकडे जामिनाची मागणी करणे, म्हणजे अटकेच्या भीतीने व्यक्तीला अटकपूर्व जामिनासाठी अर्ज करण्याची आणि उच्च न्यायालय किंवा सत्र न्यायालयाकडून जामीन मिळवण्याची परवानगी. हे कलम अटकपूर्व जामीन (-nticipatory Bail) मिळवण्यासाठी उच्च न्यायालय किंवा सत्र न्यायालयाला अधिकार देते, जिथे व्यक्तीला अटक होण्याची शक्यता असते आणि ती व्यक्ती जामिनावर सुटका मिळवू शकते. अटकपूर्व जामीनासाठी न्यायालय जामीन देताना काही अटी घालू शकते, जसे की: पोलिसांच्या चौकशीसाठी उपलब्ध असणे, पुराव्यांशी संबंधित व्यक्तींना कोणतीही धमकी न देणे आणि न्यायालयाच्या परवानगीशिवाय देशाबाहेर न जाणे. हा उपाय प्रतिबंधात्मक (preventive) स्वरूपाचा आहे. सामान्य जामीन हा अटक झाल्यानंतर दिला जातो, तर अटकपूर्व जामीन हा अटक होण्यापूर्वी दिला जातो.

SC/ST कायद्यात अटकपूर्व जामीन बंदी असणे का गरजेचे आहे?

जातीय अत्याचारांच्या प्रकरणांमध्ये, आरोपीकडून पीडितांना धमकावणे, छळ करणे किंवा दबाव आणणे याची भीती जास्त असते. अटकपूर्व जामीन मिळाल्यास आरोपी मुक्तपणे फिरून पीडितांवर दबाव आणू शकतो. म्हणून पीडितांच्या संरक्षणासाठी ही बंदी आवश्यक आहे. सामाजिक वास्तव आणि गुन्ह्यातील कठोरता लक्षात घेऊन अनुसूचित जाती–जमातींवर होणारे अत्याचार हे व्यक्तिगत नसून संरचनात्मक स्वरूपाचे आहेत. ते सामाजिक भेदभाव व जातीय श्रेष्ठतेच्या मानसिकतेतून उद्भवतात. म्हणूनच, संसदेला वाटले की या गुन्ह्यांसाठी विशेष व कठोर कायदा असणे आवश्यक आहे. सदर कलम १८ ला घटनात्मक वैधता सुद्धा मिळाली आहे. सर्वोच्च न्यायालयाने अनेक वेळा स्पष्ट केले आहे की ही बंदी कलम १४ किंवा २१ चा भंग करत नाही. कारण ही बंदी एक विशिष्ट वर्गाच्या संरक्षणासाठी आवश्यक आहे, आणि त्या वर्गाला इतिहासातील गंभीर व सातत्यपूर्ण शोषणाचा सामना करावा लागला आहे. सदर कलम १८ ला पुन्हा एकदा सप्टेंबर ०१, २०२५ च्या सर्वोच्च न्यायालयाच्या सन्मानीय मुख्य न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या निर्णयाने मुंबई उच्च न्यायालयानी (औरंगाबाद खंडपीठाने) दिलेला अटकपूर्व जामीन रद्दबातल ठरवला. किरण विरुद्ध राजकुमार जीवराज जैन (२०२५) या प्रकरणात , भारताचे मुख्य न्यायाधीश बी.आर. गवई यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने असा निर्णय दिला की, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा, १९८९ च्या कलम १८ मध्ये प्रथमदर्शनी केलेल्या गुन्ह्यांसाठी अटकपूर्व जामिनावर विशिष्ट बंधने घातली आहेत . या प्रकरणात निवडणूक वादाशी संबंधित जाती–आधारित हल्ला, गैरवापर आणि धमकी यांचा समावेश आहे. सदर प्रकरणातील तथ्ये पुढीलप्रमाणे आहेत, २६ नोव्हेंबर २०२४ रोजी, किरण नावाच्या अनुसूचित जातीतील व्यक्तीने पोलिसांकडे एफ.आय.आर. दाखल केला. त्यात त्यांनी सांगितले की, विधानसभा निवडणुकीत मतदान न केल्यामुळे राजकुमार जैन आणि त्यांच्या साथीदारांनी त्यांच्यावर व त्यांच्या कुटुंबीयांवर हल्ला केला. तक्रारीनुसार – आरोपींनी त्यांच्यावर लोखंडी रॉडने मारहाण केली, जातीवाचक शिवीगाळ केली, त्यांच्या आई व काकूंचा विनयभंग केला, मंगळसूत्र हिसकावून नेले, आणि पेट्रोलच्या बाटल्या टाकून घर जाळण्याची धमकी दिली. ही घटना प्रत्यक्ष पाहणारे स्वतंत्र साक्षीदारही होते. या आरोपांवर विचार करताना, परांडा येथील अतिरिक्त सत्र न्यायाधीशांनी स्पष्ट जातीय हेतू आणि पुरावे लक्षात घेऊन अटकपूर्व जामीन (-nticipatory Bail) नाकारला.परंतु नंतर, मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने हा निर्णय उलटवला. न्यायालयाने म्हटले की हा खटला राजकीय हेतूने लावलेला, अतिशयोक्तीपूर्ण आणि विसंगत आहे. त्यामुळे आरोपींना अटकपूर्व जामीन मंजूर केला. याच निर्णयाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात अपील करण्यात आले. सप्टेंबर ०१, २०२५ सर्वोच्च न्यायालयाचा हा निकाल अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, १९८९ या कायद्याचे उत्तरदायित्व अधिक बळकट करतो आणि कायद्याचे राज्य हे सर्वात वंचितांच्या संरक्षणाच्या बाजूने ठामपणे उभे राहिले आहे. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, १९८९ कायद्यातील कलम १८ अंतर्गत अटकपूर्व जामीनावरील बंदी ही घटनात्मक, वैधानिक व सामाजिक न्यायाच्या तत्त्वांना सुसंगत आहे, असे स्पष्ट होते. किरण विरुद्ध राजकुमार जीवराज जैन (२०२५) हा निर्णय या तत्वांना बळकटी देतो आणि भारतीय न्यायप्रणालीतील सामाजिक न्यायाच्या तत्त्वांचे पुनरुच्चार करतो.

**********

दादाराव कैलास तायडे.

(बी. कॉम., एल एल.बी., एम. ए. (राज्यशास्त्र), सेट)

# 'एज्युकेट गर्ल्स'ला मॅगसेसे मिळाल्यानंतरही थांबायचे नाहीच

दरवर्षी रॅमन मॅगसेसे पुरस्कार आपल्याला आठवण करून देतो की एकेकट्या व्यक्ती किंवा संस्था यांनी केलेला एखाद्या कल्पनेचा पाठपुरावासुद्धा कुणा अवघ्या राष्ट्राचे भवितव्य बदलणारा ठरू शकतो. यावर्षी 'एज्युकेट गर्ल्स'या भारतीय संस्थेला मिळालेला पुरस्कार ग्रामीण बालिकांच्या शिक्षणाकडे आवश्यक असा प्रकाशझोत टाकतो. हा पुरस्कार जाहीर झाल्यानंतर विजेत्यांचे अभिनंदन जगभरातून होत असताना, भारताने थांबून आपल्या देशात अजूनही अपूर्ण असलेल्या परिवर्तनाचा विचार करणे गरजेचे आहे. 'मुलगी शिकली प्रगती झाली' या घोषणेचा अर्थ असा होता की प्रत्येक ग्रामीण मुलगी शाळेत जावी, तिथे टिकावी आणि चांगले शिकावी पण प्रत्यक्षात काय झाले, याचे आत्मपरीक्षण आता तरी गरजेचे आहे.

जगातील सर्वात मोठ्या शालेय शिक्षण प्रणालींपैकी एक म्हणून भारतातील शाळांकडे पाहिले जाते. सरकारी शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा तसेच खासगी शाळा यांतून एकंदर २५ कोटींपेक्षा जास्त मुले शिकत आहेत. तरीही, विशेषत: ग्रामीण भागातील लाखो मुली माध्यमिक शिक्षण पूर्ण करण्याआधीच शाळा सोडतात ही वस्तुस्थिती आपण बदलू शकत नाही. कारणे परिचित आहेत : घरची गरिबी, पुरुषप्रधान किंवा पितृसत्ताक पद्धतीमुळे मुलीकडून घरकाम, लवकर लग्न अशाच अपेक्षा, जवळ शाळा नसणे आणि कधी कधी शाळेत शौचालय नसण्यासारखी मूलभूत बाबसुद्धा. मुलीने घेतलेल्या प्रत्येक अतिरिक्त शैक्षणिक वर्षामुळे तिचे उत्पन्न १०–२० टक्क्यांनी वाढते. सर्व मुलींनी १२ वर्षांचे शिक्षण पूर्ण केले तर पुढील दशकात भारताचे सकल राष्ट्रीय उत्पादन (जीडीपी) जवळजवळ १० टक्क्यांनी वाढू शकते, हे लक्षात घेतले तर मुलींना शिक्षणातून वगळण्याची किती प्रचंड किंमत आपण मोजतो आहोत हे लक्षात येईल. शिक्षित मुलगी लग्न उशिरा करते, तिची मुले अधिक निरोगी असतात, ती जास्त कमावते आणि आपले कुटुंब व समाज सशक्त करते. तिच्या शिक्षणाला नाकारणे हा केवळ तिच्यावरचा व्यक्तिगत अन्याय नाही– ते स्वतःच्या राष्ट्रावर केलेले घाव आहेत. मुलींनी शिकावे, यासाठी आपल्या देशात घडत असलेल्या बदलाचे एक प्रेरणादायी उदाहरण म्हणजे एज्युकेट गर्ल्स! ही संस्था सफीना हुसेन यांनी २००७ मध्ये स्थापन केली. त्या वेळी राजस्थानातील ५० गावांपासून सुरुवात करून ही संस्था आता ३०,००० हून अधिक गावांत पोहोचली असून २०लाखांहून अधिक मुली शाळेत शिकू शकतील, असे काम या संस्थेने केले आहे. 'एज्युकेट गर्ल्स'ची कार्यपद्धती साधीच, पण प्रभावी आहे : तरुण मुला–मुलींना स्थानिक स्वयंसेवक म्हणून तयार करणे, जे घराघरात जाऊन कुटुंबांना पटवून देतात की मुलींनी शाळेत गेले पाहिजे! सफीना यांचे कार्य आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरवले गेले आहे. नुकतेच त्यांना थखडए झीळश षी एर्वीलरींळेप मिळाले असून त्या हा पुरस्कार मिळवणाऱ्या पहिल्या भारतीय महिला ठरल्या आहेत. सातत्य, डेटा आणि सामाजिक भागीदारी यांचे एकत्रीकरण झाल्यास काय घडू शकते हे त्यांच्या नेतृत्वाने दाखवून दिले आहे. वर्षानुवर्षे नगण्य समजल्या जाणाऱ्या मुली आता वाचतात, लिहितात आणि त्यांच्या मातांनी कधी स्वप्नातही न पाहिलेल्या भविष्याचे स्वप्न पाहतात, हे 'एज्युकेट गर्ल्स' मुळे शक्य झाले आहे. सरकारची भूमिका मुलींच्या शिक्षणासाठीची चळवळ केवळ नागरी समाजाची जबाबदारी नाही. भारतीय सरकारनेही गंभीर प्रयत्न केले आहेत. शिक्षणाचा हक्क कायदा प्राथमिक स्तरावर जवळजवळ सार्वत्रिक नावनोंदणी घेऊन आला.

# सरकारकडून महाबोधी महाविहार, महू जन्मभूमी व नागपूर दिक्षा भूमी बौद्धांच्या ताब्यात घेतल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही..! – डॉ. भीमराव य. आंबेडकर

नवी मुंबई / के. एच. हनवते :– बिहार येथील बुद्धगया महाबोधी महाविहार आंदोलनाचे प्रणेते भंते अनागारिक धम्मपाल व पेरियार स्वामी जयंती आणि भैय्यासाहेब आंबेडकर स्मृतीदिनानिमित्त निमित्त आंदोलनाचा टप्पा २ नुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या संपूर्ण भारतीय बौद्धांची मातृसंस्था दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया (भारतीय बौद्ध महासभा), समता सैनिक दल, बौद्ध महासभा भिक्खु संघ आणि तमाम बुद्ध–आंबेडकर विचार धाराच्या समाज संघटन, संस्था, मंडळे यांच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू डॉ. भीमराव य. आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली दिनांक १७/९/२०२५ रोजी सकाळी जन आक्रोश आंदोलन मोर्चा बुद्धगया महाबोधी महाविहार, महू जन्म भूमी आणि नागपूर दीक्षाभूमी या आमच्या अस्मितेच्या, स्फूर्तीच्या धारोहर मनुवादी च्या हातातून आमच्या बौद्धांच्या हातात सरकारने दिल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू, दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया व समता सैनिक दलाचे प्रमुख डॉ. भीमराव य. आंबेडकर यांनी मुंबई मधील आझाद मैदान येथे आयोजित केलेल्या जन आक्रोश मोर्चामध्ये केले. यावेळी त्यांनी पुढील तीन मागण्यांवर आपले परखड मत मांडले १)तथागत भगवान बुद्ध यांना बुद्धत्व प्राप्त झाले ते युनेस्को ने संरक्षित केलेले जागतिक बौद्धांचे ठिकाण बोधगया महाबोधी महाविहार हे संपूर्णपणे बुद्धांना नियमन करणे साठी देण्या ऐवजी बोधगया मंदिर अधिनियम १९४९ बिहार सरकार द्वारे ९ सदस्य मध्ये केवळ ४बौद्ध सदस्य असून हा बुद्धगया मंदिर कायदा संविधानिक अधिकाराचे (अनुच्छेद २५ और २६) उल्लंघन करणारे आहे. बोधगया मंदिर कायदा १९४९ हा संपूर्णपणे संविधान अनुच्छेद १३ च्या विरोधी आहे. त्यामुळे बौद्धांचे महाबोधी महाविहार चे व्यवस्थापन पूर्णपने बुद्धांना द्यावे २)भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य स्मारक, त्यांच्या जन्म स्थळ महूमध्ये निर्माण करून, मध्यप्रदेश सरकार ने महान कार्य केले आहे. मात्र या स्मारक चे व्यवस्थापन बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधाराच्या विरुद्ध होत आहे. तेथे जयभीम शिवाय अन्य घोषणा दिल्या जात आहेत. त्यामुळे तेथे देश विदेश येथून आलेले लाखो भीम अनुयायी व्यथित होऊन त्यांचा आक्रोश अंतिम क्षणाला पोहचला आहे, त्याचे आंदोलन महु, इंदौर तथा देशभरमध्ये चालत आहे. या पार्श्वभूमीवर मध्यप्रदेश सरकार ने महु जन्म स्थली के स्मारक चे संपूर्ण व्यवस्थापन समितीच्या घटनेनुसार दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडियाकडे द्यावे. ३)नागपूर दीक्षाभूमी निर्माण करण्याचे मुळ शासकीय सम्मती पत्र तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सुपुत्र दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया चे द्वितीय राष्ट्रीय अध्यक्ष भय्यासाहेब तथा यशवंतराव भीमराव आंबेडकर यांच्या नावावर देण्यात आले होते. परंतु नंतर दीक्षाभूमी स्मारक समितीने दीक्षाभूमी वर बेकायदेशीर कब्जा केला आहे. दीक्षाभूमी वर पार्किंग च्या नावाखाली विद्रूपिकीकरण केले गेले असून त्याच्या विरोधमध्ये संविधान चौक, नागपूर मध्ये भीमसैनिका मार्फत निरंतर आंदोलन चालविले जात आहेत. त्यामुळे दीक्षाभूमी नागपूर चे विद्रूपिकीकरण दूर करून त्याचे व्यवस्थापन बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया यांच्याकडे द्यावे. तसेच डॉ भीमराव य. आंबेडकर पुढे असे म्हणाले की, आता आमच्या कक्षा वाढवाव्या लागतील मौर्य, कुशवाह, यादव हे आपलेच आहेत त्यांच्याशी संवाद साधून आपण सत्तेत येऊन आपणच आपली धरोहर संरक्षित केली पाहिजे, यावेळी बोद्धजन पंचायत समितीचे सभापती व रिपब्लिकन सेनेचे सरसेनानी: आनंदराज आंबेडकर, लक्ष्मण भगत आणि वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड. बाळासाहेब आंबेडकर यांच्यावतीने मुंबई प्रदेशचे चेतन अहिरे, स्नेहल सोहनी यांनी या आंदोलनात सहभागी होऊन पाठिंबा जाहीर केला. या आंदोलनात दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडियाचे ट्रस्टी चेअरमन डॉ. हरीश रावलिया, ट्रस्टी/राष्ट्रीय उपाध्यक्ष व मुंबई कार्यालय प्रमुख ॲड. एस. के. भंडारे, राष्ट्रीय उपाध्यक्ष सुषमाताई पवार, केंद्रीय प्रशिक्षण विभाग प्रमुख राष्ट्रीय सचिव ॲड. एस.एस.वानखडे, यु जी बोराडे (अध्यक्ष महाराष्ट्र राज्य), विलास वानखेडे (अध्यक्ष मुंबई प्रदेश), स्वातीताई शिंदे (अध्यक्षा महाराष्ट्र राज्य महिला), चंदाताई कासले (मुंबई प्रदेश अध्यक्ष महिला) विजय गायकवाड (अध्यक्ष ठाणे), सुशिल वाघमारे (रायगड दक्षिण अध्यक्ष), संतोष जाधव (रायगड उत्तर अध्यक्ष), नामदेव जगताप (अध्यक्ष नवी मुंबई जिल्हा), प्रफुल्ल सुपे (पालघर जिल्हा अध्यक्ष), अनंत जाधव (झोन ५अध्यक्ष), विमलानंद कांबळे (ठाणे महानगर अध्यक्ष), मनिषा साळवे (मुंबई झोन ५) यांनी आंदोलनाची भूमिका मांडली. राष्ट्रीय सचिव बी एच गायकवाड व भिकाजी कांबळे यांनी सूत्रसंचलन केले. संस्थेचे ट्रस्टी कॅप्टन प्रविण निखाडे आणि राष्ट्रीय उपाध्यक्ष ड. डॉ. जगदीश गवई यांची प्रमुख उपस्थिती होती. मोर्चाचे व्यवस्थानाचे काम समता सैनिक दलाचे डी एम आचार्य, प्रदीप कांबळे, मोहन सावंत, वंदनाताई सावंत, वासुदेव हिवराळे, निलेश पवार, मंगेश अडसुळे, अभिजीत गरबडे इत्यादींनी केले. या आंदोलनाला जनतेचा प्रचंड प्रतिसाद मिळाला असून सुमारे पाच हजार जनसमुदाय आझाद मैदानावर एकवटला होता. शिस्तबद्ध आणि उत्साहपूर्ण पद्धतीने हे आंदोलन पार पडले. या कार्यक्रमाला मुंबई प्रदेशचे सहा झोन, ठाणे, पालघर, नवीमुंबई, रायगडचे बौद्ध उपासक, उपासिका, पदाधिकारी, कार्यकर्ते, दलाचे अधिकारी, सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. हे आंदोलन यशस्वी होण्यासाठी वरील पदाधिकारी शिवाय मुंबई प्रदेशचे दयानंद बडेकर, राजेंद्र सत्वधीर, विलास ढोबळे, सागर गांगुर्डे, तानाजी साबळे, सुनील बनसोडे, संतोष मटकर, दिलीप लिहिणार, अनिल पहूरकर, ए.के. जाधव, अशोक जाधव, बबन तायडे, विलास खाडे, सोनाली कटारनवरे, सारिका झिमुर केंद्रीय कार्यालयचे डॉ. राजेश पवार, बी. एम. कांबळे, सी. बी. तेलतुंबडे, रागिणीताई पवार, सुप्रियाताई कासारे, अनिल मनोहर महाराष्ट्र राज्याचे अशोक केदारे, प्रशांत गडकरी, उत्तम मगरे, रवींद्र गवई, जयवंत लव्हांडे, सुजाताताई कांबळे, छायाताई घोक्षे, सुनंदाताई वाघमारे इत्यादीनि परिश्रम घेतले.



# ताप आल्यावर तुम्हीही पॅरासिटामॉल घेत असाल तर सावधान! डॉक्टरांनी सांगितले, एक चूक पडू शकते महागात

आपण भारतीय, छोट्या छोट्या समस्या सोडवण्यासाठी पॅरासिटामॉलवर थोडे जास्त अवलंबून आहोत. ते केमिस्टच्या दुकानात सहज उपलब्ध आहे आणि स्वस्तदेखील आहे. मात्र, जास्त प्रमाणात पॅरासिटामॉल घेतल्याने त्याचे काही धोकेही असू शकतात. डॉ. कपिल अडवाणी, फार्मडी, क्लिनिकल फार्मासिस्ट, कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटल यांनी दी इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना यासंदर्भात सविस्तर माहिती दिली आहे.

डॉ. कपिल अडवाणी यांनी सांगितले की, लोक पॅरासिटामॉल पूर्णपणे निरुपद्रवी आहे असे समजून घेतात, कारण ते सहज उपलब्ध आहे, परंतु शरीर लक्षात ठेवते. नियमित सेवनाने यकृताचे नुकसान होऊ शकते, मूत्रपिंडांवर ताण येऊ शकतो आणि तुमच्या रक्तदाबातही अडथळा येऊ शकतो. बऱ्याचदा, आपण स्वतः औषधोपचार करण्याचा प्रयत्न करतो आणि गोळ्या घेतो. परंतु, असे केल्याने आपल्या शरीराचे दीर्घकालीन नुकसान होऊ शकते. दरम्यान, तापाच्या वेळी रिकाम्या पोटी पॅरासिटामॉल घेतल्यास काय परिणाम होतो जाणून घ्या. तापासाठी रिकाम्या पोटी पॅरासिटामॉल घेणे सामान्यतः सुरक्षित मानले जाते आणि त्यामुळे लक्षणे लवकर दूर होतात, कारण अन्नाशिवाय रक्तप्रवाहात त्याचे शोषण जलद होते. जरी पॅरासिटामॉल मुख्यतः यकृताद्वारे प्रक्रिया केले जात असले तरी रिकाम्या पोटी ते शिफारस केलेल्या डोसमध्ये घेतल्यास यकृतावर ताण येण्याचा धोका वाढत नाही, तसेच ते गॅस्ट्रोइंटेस्टाइनल जळजळ निर्माण करत नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. डॉ. अडवाणी यांच्या मते, यूकेमधील एनएचएससह अनेक वैद्यकीय व्यावसायिक आणि आरोग्य संस्था रिकाम्या पोटी पॅरासिटामॉल घेण्याचा सल्ला देतात, पोटाच्या आवरणावर त्याचा सौम्य परिणाम आणि तीव्र परिस्थितीत वेदना आणि ताप जलद कमी होण्याच्या फायद्यांवरप्रकाश टाकतात. तरीही त्यांनी इशारा दिला की ज्यांना मळमळ होण्याची शक्यता असते ते अतिरिक्त आरामासाठी ते अन्नासोबत घेण्याचा पर्याय निवडू शकतात.



जर तुम्ही औषधांचा अति वापर केला तर? पॅरासिटामॉल हे जगात सर्वाधिक वापरल्या जाणाऱ्या औषधांपैकी एक आहे. प्रौढांसाठी दररोज चार ग्रॅम (सुमारे आठ ५०० मिलीग्राम गोळ्या) ही कमाल मर्यादा आहे, पण ती दररोजची कमाल मर्यादा आहे. दुर्दैवाने, बरेच लोक जास्त विचार न करता आठवड्यातून अनेक वेळा ते घेतात, असे त्यांनी सांगितले. २०१९ च्या अभ्यासानुसार, शिफारस केलेल्या मर्यादेतही दीर्घकालीन वापरामुळे यकृतातील एंझाइमची पातळी वाढू शकते, जे यकृतावरील ताण दर्शवते. मद्यपान करणाऱ्या, आधीच यकृताच्या आजार असलेल्या किंवा कमी वजनाच्या लोकांसाठी यकृताचे नुकसान हा एक गंभीर धोका आहे. २०२२ च्या एका अभ्यासातून असे दिसून आले आहे की, एकाच दिवशी ४ ग्रॅम या प्रमाणात पॅरासिटामॉल दोन आठवडे घेतल्याने उच्च रक्तदाब असलेल्यांमध्ये रक्तदाब वाढतो, असे डॉ. अडवाणी यांनी २०१५ च्या एका जुन्या अभ्यासाचा उल्लेख करत म्हटले आहे. ज्यामध्ये नियमित वापर (दोन–चार ग्रॅम/दिवस) पोटदुखीशी जोडला गेला होता आणि तीन ग्रॅमपेक्षा जास्त डोस घेतल्यास पोटातील रक्तस्त्राव होण्याचा धोका जास्त असतो. प्रौढांसाठी दररोज जास्तीत जास्त ४ ग्रॅम डोस ओलांडणे यासारखे महत्त्वाचे धोके टाळणे अत्यंत महत्त्वाचे आहे, कारण यामुळे यकृत विषारी होऊ शकते, असे ते म्हणाले. अधिक मार्गदर्शनासाठी तुम्ही तुमच्या डॉक्टरांशी किंवा फार्मासिस्टशी संपर्क साधावा.

## मॉर्निंग वॉक की इव्हिनिंग वॉक? कोणत्या वेळी चालणे आरोग्यासाठी ठरते फायदेशीर

चालण्याची सवय ही उत्तमच आहे, मात्र हृदय आणि रक्तातील साखरेच्या नियंत्रणासाठी ही सवय एखाद्या औषधासारखं काम करू शकते. उच्च रक्तदाब असलेल्या किंवा मधुमेह असलेल्या लोकांना डॉक्टर नियमित चालण्याचा सल्ला देतात. मात्र चालण्याची योग्य वेळ नेमकी कोणती हा प्रश्न अनेकांना पडतो. काहींना वाटतं सकाळी वॉक करणे उत्तम असते, तर काहींना वाटतं की संध्याकाळच्या चालण्याने आरोग्य उत्तम राहू शकते. एका संशोधनातून असे दिसून आले की, दोन्ही वेळा चालण्याचे अद्वितीय परिणाम आहेत. त्यामुळे कधी चालणे चांगले याचं उत्तर क्वचितच डॉक्टर देऊ शकतात.

शरीराच्या घड्याळाची भूमिका प्रत्येक मानवी शरीर एका नैसर्गिक घड्याळावर चालते. त्याला सर्केडियन रिदम म्हणतात. या घड्याळानुसार शरीराची ऊर्जेची पातळी कधी वाढेल आणि कधी आळस येईल हे ठरते. रक्तातील साखर आणि रक्तदाबदेखील यानुसार वरखाली होतात. सकाळी लवकर कॉर्टिसॉलसारखे स्ट्रेबस हार्मोन्स अगदी टोकावर असतात. ते रक्तातील साखर आणि रक्तदाब दोन्ही वाढवू शकतात. त्यामुळे सकाळी उठल्यावर लगेचच चालणे या वाढीला कमी करण्यास मदत करू शकते.

अनेक अभ्यासातून असे दिसून आले की, सकाळी चालणे तेसुद्धा नाश्त्यापूर्वी हे इन्सुलिन संवेदनशीलता सुधारण्यास मदत करते. म्हणजेच शरीर रक्तातील साखरेचा वापर अधिक कार्यक्षमतेने करू शकते. रक्तदाबासाठी सकाळी चालणे हे फायदेशीर ठरू शकते. साधारण हळूहळू चालणे हे एखाद्या औषधाप्रमाणे मदत करू शकते आणि ते दिवसभर रक्तदाब नियंत्रित ठेवते.



संध्याकाळी चालणे सकाळी चालण्याचे फायदे असले तरी जेवणानंतरच्या चालण्याचाही फायदा आहेच. दुपारच्या आणि रात्रीच्या जेवणानंतर रक्तातील साखरेचे प्रमाण वाढते. संध्याकाळी चालण्यामुळे स्नायूंना अतिरिक्त साखर शोषण्यास मदत होते. त्यामुळे अतिरिक्त औषधांशिवाय पातळी कमी होते. अनेक लोकांसाठी जेवणानंतर १५ ते २० मिनिटे चालल्यानेही जेवणानंतर साखरेच्या वाढीवर नियंत्रण ठेवण्यात उल्लेखनीय परिणाम दिसून आले आहेत. संध्याकाळी रक्तदाबदेखील नैसर्गिकरित्या कमी होतो आणि त्यावेळी चालण्यामुळे हृदयाला अधिक आराम मिळतो.

रक्तदाबावर होणारे परिणाम वेगवेगळे हायपरटेन्शन जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या संशोधनात असे दिसून आले की, सकाळी चालणाऱ्या लोकांमध्ये दिवसा रक्तदाब कमी झाल्याचे दिसून आले. तसंच संध्याकाळी चालणाऱ्या लोकांमध्ये रात्रीच्या वेळी सुधारणा दिसली. म्हणजेच दोन्ही वेळा चालण्याचे वेगवेगळे असे परिणाम आहेत. सकाळी उठल्यानंतर रक्तदाब वाढीवर नियंत्रण ठेवण्यासाठी चांगले असते, तर संध्याकाळी बरे होण्यास मदत होते.

रक्तातील साखरेच्या पातळीवरही परिणाम रक्तातील साखरेवरील नियंत्रणासाठी सकाळी चालल्यास चयापचय सुधारते. मात्र, संध्याकाळी चालणे जेवणानंतर अचानक वाढणाऱ्या हालचालींना लक्ष्य करते. यामुळे रात्रीच्या जेवणानंतर ज्यांची साखरेची पातळी वाढते त्यांच्यासाठी संध्याकाळी चालणे हा उत्तम पर्याय आहे. संशोधनानुसार, सकाळच्या तुलनेत जेवणानंतर संध्याकाळी चालणे साखरेचे प्रमाण अधिक प्रभावीपणे कमी करते.

संतुलित दृष्टिकोन हे खरंच आहे की, सकाळ किंवा संध्याकाळ यापैकी एक योग्य आहे हे सांगता येणार नाही. रक्तदाबासाठी सकाळच्या वेळी चालणे अधिक फायदेशीर ठरते, तर रक्तातील साखरेवर नियंत्रण मिळवण्यासाठी संध्याकाळी चालणे उपयोगी ठरते. मात्र, यामध्ये सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे सातत्य. तुम्ही सकाळी चाला किंवा संध्याकाळी किंवा सूर्यप्रकाशात नमस्कार करणे असो या सवयी महत्त्वाच्या आहेतच. मात्र, त्यामध्ये सातत्या असणं आणि त्या वेळोवेळी करणं महत्त्वाचं आहे.

दरम्यान, असं असलं तरी ज्यांना उच्च रक्तदाब किंवा हाय शुगर समस्या असेल त्यांनी हे दिनचर्येतील बदल डॉक्टरांच्या सल्ल्यानुसारच करावेत.

## संध्याकाळ होताच काही चटपटीत खायची इच्छा होतेय? मग घरीच बनवा स्वादिष्ट ‘रगडा चाट’; काही मिनिटांत तयार होते रेसिपी

भारतीय स्ट्रीट फूड म्हटलं की चाट पदार्थ सर्वात पहिल्यांदा डोळ्यासमोर येतात. चाटची दुनिया ही चव, तिखटपणा, गोडवा आणि आंबटपणाचा परफेक्ट संगम आहे. मुंबई, पुणे, नागपूर किंवा इतर कुठल्याही शहरात आपण फिरलो तर चाटच्या गाड्या आपल्याला सहज दिसतात. त्यातलं रगडा चाट हे खास लोकप्रिय आहे. उकडलेल्या वाटाण्याचा मऊसर रगडा, कुरकुरीत पुरी, त्यावर घातलेले दही, चटण्या, शेव आणि मसाल्यांनी सजलेला हा पदार्थ तोंडाला पाणी आणतो. हा फक्त खाऊ नाही तर प्रत्येक घासात चविष्ट अनुभव आहे. घरच्या घरी रगडा चाट बनवलं तर स्वच्छतेसोबत आपण आपल्या आवडीनुसार तिखट, गोड, आंबटपणा कमी–जास्त करू शकतो. खास करून मुलांना आणि कुटुंबाला संध्याकाळी हा पदार्थ दिला तर सगळ्यांचा मूड फ्रेश होतो. यासाठी फार मेहनत घेण्याचीही गरज नाही तर ही चाट अवघ्या काही मिनिटांतच बनून तयार होते. चला तर मग जाणून घेऊया यासाठी लागणारे साहित्य आणि कृती. साहित्य सफेद वाटाणे – १ कप (रात्रभर भिजवून घेतलेले) हळद – ट चमचा मीठ – चवीनुसार पाणी – आवश्यकतेनुसार चटण्या : हिरवी चटणी (कोथिंबीर–पुदिन्याची) गोड चिंचे–गुळाची चटणी लसूण–तिखट चटणी (ऑप्शनल) टॉपिंगसाठी : दही – १ वाटी (फेटून घेतलेले) कांदा – १ बारीक चिरलेला टोमॅटो – १ बारीक चिरलेला शेव – ट कप कोथिंबीर – बारीक चिरलेली चाट मसाला – १ चमचा लाल तिखट – ट चमचा पुरी – ८–१० कृती यासाठी सर्वप्रथम सफेद वाटाणे रातभर भिजत घालून दुसऱ्या दिवशी कुकरमध्ये हळद, मीठ व पाणी घालून मऊसर होईपर्यंत शिजवून घ्या. शिजलेले वाटाणे मॅश करून रगडा तयार करा. एका प्लेटमध्ये २–३ पुरी ठेवा किंवा गरमागरम रगडा ओतून बेस तयार करा. त्यावर हिरवी व गोड चिंचेची चटणी घाला. हवे असल्यास लसूण चटणी घाला. दही वरून टाका आणि कांदा, टोमॅटो पसरवा. वरून चाट मसाला, तिखट भुरभुरवा.



# उपजिल्हाधिकारी कार्यालयावर जन आक्रोश मोर्चा

अंबाजोगाई/प्रतिनिधी भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष आयु. भीमराव यशवंत आंबेडकर यांच्या आदेशाने बीड जिल्हा पूर्वच्या भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष ड.बी.बी. धन्वे यांच्या नेतृत्वात अंबाजोगाई येथे उप जिल्हाधिकारी कार्यालयावर सनदशीर मार्गाने जन आक्रोश मोर्चा काढण्यात आला या मोर्चामध्ये भारतीय बौद्ध महासभेचे, समता सैनिक दल,. बुद्ध भिक्खू संघ यांच्यासह आंबेडकरवादी संघटनेचे पदाधिकारी आणि यांच्यासह भीमसैनिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया भारतीय बौद्ध महासभा,समता सैनिक दल, बौद्ध भिक्खु संघ व विविध आंबेडकरवादी संघटनांच्या संयुक्त विद्यमाने जन आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष आयु. भीमराव यशवंत आंबेडकर यांच्या आदेशाने बीड जिल्हा पूर्वच्या भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष ड.बी.बी.धन्वे यांच्या नेतृत्वात अंबाजोगाई येथे उप जिल्हाधिकारी कार्यालयावर सनदशीर मार्गाने जन आक्रोश मोर्चा काढण्यात आला. या आंदोलनातून सरकारसमोर तीन ठाम मागण्या मांडल्या यामध्ये बोधगया महाबोधी महाविहारचा संपूर्ण प्रबंधन अधिकार बौद्ध समाजाकडे घेण्यात यावेत, महू जन्मभूमी स्मारकाचे व्यवस्थापन दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया कडे सोपविण्यात यावेत,नागपूर दीक्षाभूमीवरील विद्रूपीकरण थांबवून प्रबंधन आंबेडकर परिवाराकडे द्यावेत. सदरचा मोर्चा हा शिस्तबद्ध व उत्साही वातावरणात जनसमुदाय एकवटला आणि आम्ही सजग आहोत व संघर्षासाठी सदैव तयार आहोत हा ठाम संदेश दिला. यावेळी उपस्थित भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष ड.बी. बी.धन्वे,संस्कार उपाध्यक्ष एस. बी.मोरे,संस्कार सचिव एस.एन. वाघमारे, संरक्षण सचिव आर. डी.जोगदंड,केज शहराध्यक्ष जे. आर.मस्के,माजी तालुकाध्यक्ष एन.बी.मस्के, व्यंकट वेडे यांच्यासह भारतीय बौद्ध महासभेचे, समता सैनिक दल, दलित चळवळीतील विविध संघटनेचे पदाधिकारी आणि बौद्ध समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर मागणीची प्रशासनाने तात्काळ दखल न घेतल्यास यापुढे तीव्र स्वरूपाचा लढा उभा करू असा सजग प्रशासनाला इशारा देण्यात आला आहे.



# तेलाने काळीकुट्ट-चिकट झालेली कढई एका मिनिटांतच होईल नव्यासारखी चकचकीत; पैसेही खर्च कारण्याची गरज नाही, घरगुती टिप्सचा करा वापर

आपल्या स्वयंपाकघरात अनेक अशी भांडी आहेत ज्यांचा दररोज जेवण बनवण्यात वापर केला जातो. सततच्या वापरामुळे अनेकदा ही भांडी खराब होऊ लागतात आणि यांच्यावर तेलाचा चिकट थर बसू लागतो. यातीलच एक म्हणजे घरात वापरली जाणारी कढई बहुतेक सर्वांच्याच घरात जेवण बनवण्यासाठी कढईचा वापर केला जातो. तेल आणि मसाल्यांमुळे भांड्यांवर अनेकदा ग्रीस जमा होऊ लागते. आपण जर हे वेळीच नीट घासले नाही तर याचा थर आणखीन चिकट आणि मजबूत होऊ लागतो ज्यांनंतर याला दूर करणे कठीण होऊन बसते. अशात आज आम्ही तुम्हाला काही घरगुती टिप्सच्या मदतीने काळी–चिकट झालेली भांडी सोप्या पद्धतीने घरीच स्वच्छ कशी करायची याची एक सोपी ट्रिक सांगत आहोत. मुख्य म्हणजे यासाठी तुम्हाला कोणतेही पैसे खर्च करण्याची गरज नाही तर घरगुती पदार्थांचा वापर करूनच आपण भांड्यांना नवी चकाकी देऊ शकतो. चला या ट्रिकविषयी सविस्तर जाणून घेऊया.

बेकिंग सोडा जळलेले पदार्थ, काळे डाग आणि ग्रीस काढण्यासाठी बेकिंग सोडा प्रभावी उपाय मानला जातो. यामध्ये असलेले घटक भांड्यांवर जमा झालेली सर्व घाण काढून मदत करतात. यासाठी प्रथम कढई पूर्णपणे बुडेल इतपत गरम पाणी घ्या आणि यात त्यात २–३ चमचे बेकिंग सोडा घाला. रात्रभर किंवा काही तास बेकिंग सोडा घातलेले हे गरम पाणी कढईत तसेच राहू द्या आणि मग सकाळी साबण आणि स्क्रबने कढईला घासून स्वच्छ करा. तुम्हाला दिसेल की कढईवर चिकटलेले तेलाचे काळे डाग याच्या मदतीने सहज दूर होऊ लागतील आणि कढई नव्यासारखी चकचकीत साफ होईल.

बेकिंग पावडर आणि मीठ बेकिंग पावडरमध्ये असलेले घटक भांड्यांवर जमा झालेली सर्व घाण काढून टाकू शकतात. कढई स्वच्छ करण्यासाठी, एका भांड्यात पाणी घ्या आणि त्यात काही चमचे बेकिंग पावडर आणि मीठ मिसळून हे पाणी गॅसवर छान उकळवून घ्या. हे मिश्रण उकळल्यानंतर, त्यात कढई बुडवा आणि काही वेळ राहू द्या. नंतर स्क्रब आणि भांड्यांच्या साबणाने कढईला छान स्वच्छ करा. अशाप्रकारे कढई साफ करण्यासाठी तुम्हाला कोणत्याही मेहनतीची गरज लागणार नाही आणि अगदी सहज कढईवरील डाग दूर होतील.

मीठ आणि लिंबू पॅनवरील ग्रीस काढून टाकण्यासाठी स्वयंपाकघरातील मीठ आणि लिंबूचाही वापर करता येईल. यासाठी सर्वप्रथम पॅन किंवा पॅनमधील पाणी काढून टाका. आता गॅस चालू करा आणि या पाण्यात २ चमचे डिटर्जंट, एक चमचा मीठ आणि एक चमचा लिंबाचा रस घाला. तुम्हाला हे मिश्रण सुमारे ५ मिनिटे उकळवा. या मिश्रणात असलेले घटक पॅनचा काळेपणा आणि ग्रीस काढून टाकण्यास उपयुक्त ठरू शकतात.

चपाती की भाकरी सगळ्यात जास्त पोषक घटक कशात असतात ? व्हाईट व्हिनेगर

जर तुम्हाला कढई किंवा तव्यावर साचलेली घाण, ग्रीस आणि काळेपणा काढून भांडी नव्यासारखी बनवायची असेल तर तुम्ही व्हाईट व्हिनेगर तुमच्यासाठी एक चांगला पर्याय ठरेल. यासाठी लिंबाचा रस आणि एक कप पांढरा व्हिनेगर पाण्यात मिसळा. आता तुम्हाला कढई किंवा तव्याला या पाण्यात काही वेळ भिजवावे लागेल आणि नंतर स्क्रबने घासून भांडी पूर्णपणे स्वच्छ करा.

# गावठी कट्टा बाळगणारा युवक ताब्यात. स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई.

लातूर :- गावठी कट्टा बाळगणारा युवक ताब्यात. स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई.

याबाबत अधिक माहिती अशी की,लातूर जिल्हा पोलीस अधीक्षक श्री.अमोल तांबे यांनी अवैध शस्त्र बाळगणाऱ्यावर कारवाई करण्याबाबत आदेशित केले होते. त्याअनुषंगाने पोलीस अधीक्षक अमोल तांबे,अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाकडून कार्यवाही करण्यात येत होती. पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीचे विश्लेषण करून सदरची माहिती खरी असल्याचे निष्पन्न होताच दिनांक १८/०९/२०२५ रोजी दुपारी लातूर च्या मध्यवर्ती बसस्थानक परिसरातून एका युवकास ताब्यात घेऊन त्याच्याकडून एक गावठी कट्टा (पिस्टल) हस्तगत करण्यात आले आहे.



स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्त बातमीदार मार्फत मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारावर चंद्रकांत हरिबा शिंदे, वय २६ वर्ष, राहणार गांजरखेडा, तालुका औसा जिल्हा लातूर. यास ५० हजार रुपये किमतीच्या गावठी कट्ट्यासह ताब्यात घेण्यात आले असून पोलीस ठाणे गांधी चौक येथे भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील पथका मधील सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिक डोके, सफौ/सर्जेराव जगताप, पोलीस अंमलदार गोविंद भोसले, राजेश कंचे,विनोद चलवाड, चंद्रकांत डांगे, प्रशांत स्वामी, महादेव शिंदे, तुळशीराम बरुरे, बंडू नीटुरे यांनी केली आहे.

# शाहूच्या सायबर वॉरियर्सकडून सायबर सुरक्षा जनजागृती रॅली व विघ्नहर्त्याच्या सायबर सोहळा

लातूर/प्रतिनिधी: राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त) व क्विक हिल फाउंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा हा उपक्रम लातूर जिल्ह्यात राबविला जात आहे. राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर व कापड लाईनचा राजा गणेश मंडळ, लातूर यांच्यातर्फे विघ्नहर्त्याच्या सायबर सोहळा आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्याचे उद्घाटन लातूर लोकसभा खासदार डॉ. शिवाजीराव काळगे यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माजी खासदार डॉ. गोपाळराव पाटील, उपाध्यक्ष डॉ. पंढरीनाथ देशमुख, सचिव प्राचार्य अनिरुद्ध जाधव व संस्थेचे इतर सन्माननीय सदस्य, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, गणेश मंडळाचे अध्यक्ष श्री. झिपरे हे उपस्थित होते. या कार्यक्रमांतर्गत महाविद्यालय - गांधी चौक - मुख्य बस स्थानक - सुभाष चौक - जगदंबा मंदिर - कापड लाइनचा राजा गणेश मंडळ या मार्गाने सायबर रॅली काढण्यात आली होती तसेच सर्व मुख्य ठिकाणी शाहू महाविद्यालयाच्या सायबर वॉरियर्सनी सायबर फ्रॉड्स कसे घडतात, अनोळखी मेसेजेस व लिंक्सवर क्लिक न करणे, वैयक्तिक माहिती शेअर न करणे, इंटरनेटचा योग्य वापर कसा करावा, सायबर सेलला गुन्हा कसा नोंदवायचा, त्यासोबतच १९३०



या सायबर सेल हेल्पलाईन नंबरविषयी पथनाट्यातून जनजागृती केली. या कार्यक्रमाला लातूरकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला व विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# लातूर येथे कॉँग्रेसची आढावा बैठक संपन्न, संघटनात्मक बांधणीवर भर.

## स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत कॉँग्रेसचा तिरंगा फडकवन्याचा बैठकीत निर्धार.

लातूर / प्रतिनिधी :- लातुर शहर आणि जिल्हा कॉँग्रेस कमिटीच्या वतीने नुकतीच एक आढावा बैठक पार पडली.या बैठकीत आगामी काळासाठी कॉँग्रेस पक्षाला संघटनात्मक दृष्ट्या अधिक मजबूत करण्यावर भर देण्यात आला. तसेच आगामी होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये कॉँग्रेस पक्षाच्या रणनीतीवर चिंतन करण्यात आले. जिल्हा परिषद, महानगरपालिका,नगर पंचायत आणि पंचायत समितीच्या निवडणुकांमध्ये कॉँग्रेसच विजयी होणार हा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. या बैठकीला महाराष्ट्र प्रदेश कॉँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष तथा जिल्हा प्रभारी- बाळासाहेब देशमुख, लातूर शहर व ग्रामीण विधानसभा प्रभारी- डॉ.जितेंद्र देहाडे,उदगीर विधानसभा प्रभारी- अलका राठोड ताई, निलंगा विधानसभा प्रभारी- सुरेश हावळे, अहमदपूर विधानसभा प्रभारी- धनराज राठोड,औसा विधानसभा प्रभारी- डॉ. श्रावण रॅपनवाड,जिल्हाध्यक्ष- अभय साळुंके,शहर जिल्हाध्यक्ष ॲड.किरण जाधव,प्रदेश सरचिटणीस- अमर खानापुरे,प्रदेश सचिव ड.समद पटेल,प्रदेश सचिव- विद्याताई पाटील,प्रदेश सचिव- डॉ.दिनेश नवगिरे,माजी महापौर प्रा.डॉ. स्मिता खानापुरे,माजी महापौर ड.दिपक सुळ,माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे यांच्यासह लातुर शहर व जिल्हा कॉँग्रेस पक्षाचे विविध सेलचे पदाधिकारी, आणि कार्यकर्ते उपस्थित होते. या बैठकीत बोलताना प्रदेश उपाध्यक्ष तथा प्रभारी बाळासाहेब देशमुख म्हणाले की,आगामी जिल्हा परिषद,नगरपालिका,पंचायत समिती आणि महानगरपालिका निवडणुकांमध्ये कॉँग्रेस पक्षाने एकहाती विजय मिळवण्याचे उद्दिष्ट ठेवले असल्याचे




सांगत यासाठी प्रभावी व्यूहरचना आणि संघटनात्मक बांधणीवर या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आवाज दरम्यान या बैठकीत शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांबाबतही ठराव मांडण्यात आले.यात प्रामुख्याने शेतकऱ्यांची कर्जमाफी झाली पाहिजे अशी मागणी करण्यात आली. तसेच अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत द्यावी आणि जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करावा तसेच दुष्काळग्रस्त भागाला त्वरित मदत जाहीर करावी,अशा मागण्या शासनाकडे करण्यात आल्या. नेतृत्व आणि धोरण माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली लातूर जिल्ह्यातच नव्हे,तर मराठवाडा आणि महाराष्ट्रात कॉँग्रेस अधिक मजबूत होईल,असा विश्वास कॉँग्रेसचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी या बैठकीत व्यक्त केला. तसेच उपस्थित सर्व पदाधिकाऱ्यांनी आगामी काळात एकजुटीने काम करून कॉँग्रेसला यश मिळवून देण्याचा निर्धार देखील केला. या बैठकीमुळे कॉँग्रेस पक्ष लातूरमध्ये अधिक सक्रिय झाला असून,भविष्यात निवडणुका आणि सामाजिक कामांमध्ये त्यांचा सहभाग वाढल्याचे दिसून येईल. अमित देशमुख यांच्या सूचनेनुसार अतिवृष्टी ग्रस्त भागाच्या मदतीसाठी कॉँग्रेसची वॉर रूम या बैठकीच्या निमित्ताने राज्याचे माजी मंत्री आ.अमित देशमुख यांच्या सूचनेनुसार जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांनी कॉँग्रेसकडून शुक्रवारी लातूर जिल्ह्यातील अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या नुकसानग्रस्तांच्या मदतीसाठी कॉँग्रेस भवन लातूर येथे वॉर रूम तयार केली असून पक्षाचे पदाधिकारी असलेले ह.भ.प.शरद देशमुख,इसरार सगरे,सोनू डगवाले आणि प्रवीण सूर्यवंशी यांच्यावर या वॉर रूम ची जबाबदारी सोपवण्यात आली असून या वॉर रूमच्या माध्यमातून लातुर शहर व जिल्ह्यातील नैसर्गिक आपत्तीची माहिती महसूल मंडळ निहाय संकलित करून शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रशासनाच्या खांद्याला खांदा लावून युद्ध पातळीवर सक्रिय राहील. दरम्यान यावेळी लातूर जिल्हा कॉँग्रेस कमिटीचे अध्यक्ष- अभय साळुंके यांनी जिल्ह्यातील पक्ष कार्याचा आढावा सादर केला तर लातूर शहर जिल्हा कॉँग्रेस कमिटीचे अध्यक्ष ड.किरण जाधव यांनी शहर कॉँग्रेस कार्याचा आढावा सादर केला. बैठकीचे सूत्रसंचलन प्रवीण सूर्यवंशी यांनी केले तर आभार पंकज शेळके यांनी मानले.

# बिटरगाव येथील शिवाजी विद्यालयात मराठवाडा मुक्ती संग्राम दिन साजरा

रेनापुर/ प्रतिनिधी:- रेनापुर तालुक्यातील बिटरगाव येथील शिवाजी विद्यालयात मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात साजरा करण्यात आला. बिटरगावचे सरपंच महेंद्र माणिकराव पाटील यांच्या शुभ हस्ते ध्वजारोहण झाले. मुख्याध्यापक सूर्यकांत चव्हाण यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, हा संघर्ष लोकशाही, स्वातंत्र्य आणि स्वाभिमानासाठीचा एक ऐतिहासिक लढा आहे.



कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते, भाषणं सादर केली. शेवटी हुतात्म्यांना अभिवादन करून कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी वसंत यादव, अरूण काळे, मल्लिकार्जुन ठोंबरे, गौतम जाधव, वेणूनाथ यादव, सुभाष सोनटक्के, रमाकांत यशवंत, पद्माकर लकडे, गंगाधर इरले, सत्यवान कांबळे ,तसेच प्रतिष्ठित नागरिक एकनाथ हनवते आदि उपस्थित होते.

# लातूरच्या सेवानिवृत्त पोलीस अधिकाऱ्याच्या मुलीचा पुण्यात खून!

## आरोपी पती, सासू व नणंदेला अटक करा अन्यथा आत्मदहन करणार : विष्णू शिंदे यांचा पत्रकार परिषदेत इशारा

लातूर : औसा तालुक्यातील नागरसोगा येथील मूळचा रहिवाशी असलेल्या आणि सद्या पुणे येथे राहत असलेला जावई आकाश बेडगे, सासू गीताबाई बेडगे व नणंद जयश्री साबळे, केदार पाटील, अजिंक्य देशपांडे, नितीन सोमवंशी, आशिष कावळे यांनी संगमताने आपल्या विवाहित मुलीला पैशासाठी छळ करून तीचा खून करून आत्महत्येचा बनाव रचला आहे. आरोपीना तात्काळ अटक करून दोन दिवसात कठोर शिक्षा द्यावी, अन्यथा पुणे जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालसमोर कुटुंबासह आमरण आत्मदहन करण्याचा इशारा आज काशी लिंगेश्वर नगर, लातूर येथे १९ सप्टेंबर रोजी आयोजित पत्रकार परिषदेत हुंदका भरल्या अवस्थेत सेवानिवृत्त पोलीस अधिकारी विष्णू शिंदे यांनी दिला आहे. विष्णू शिंदे यांनी म्हटले आहे कीं, १० जून २०१४ रोजी माझी मुलगी अनुराधा हिचा विवाह रितिरिवाजाप्रमाणे औसा तालुक्यातील नागरसोगा येथील आकाश नामदेव बेडगे यांच्याशी लावून दिला होता. सर्व देणी करून





हा विवाह पार पडला. सुरुवातीचे दोन वर्षे सुरुळीत आनंदित चालले होते. त्यांना एक मुलगा व एक मुलगी आहे. सद्या ते पसायदान सोसायटी, यमुनानगर निगडी येथे प्लॅट नं. १५ मध्ये राहत होते. ज्या ज्या वेळेस सासरच्यांनी पैसे मागितले त्या त्या वेळेस पैसे दिले. आतापर्यंत ५० लाख रुपये दिले आहेत. जावई जमीन खरेदी विक्रीचा व्यवसाय करीत होते. अशातच आणि अचानक १ सप्टेंबरला दुपारी सव्वा चार वाजताच्या दरम्यान विष्णू शिंदे यांना जावई आकाश बेडगे यांचा फोन आला कीं तुमच्या मुलीने आत्महत्या केलीय. लागलीच शिंदे यांचे सर्व कुटुंबीय पुण्याला गेले. तिथे मुलीचा मृतदेह पाहून सर्वांनी एकच हंबरडा फोडला. मुलीच्या शरीरावर मारहानीचे व्रण दिसून आले. तिला आधी जिवे मारून नंतर साडीने गळफास देऊन सिलिंग फॅनला लटकावण्यात आलेले स्पष्ट दिसून येत आहे. तिने आत्महत्या केली नसून तीचा शारीरिक व मानसिक छळ करून तीचा खून करण्यात आला आहे. असा आरोप मुलीचे वडील विष्णू शिंदे यांनी पत्रकार परिषदेत केला आहे. माझ्या मुलीचा छळ करून तीचा खून करणाऱ्या तिच्या पतीसह, सासू व नणंद इतर सहभागी आरोपीना गुन्हा दाखल होऊन १८ दिवस झाले तरी फरार आरोपीना अटक करण्यात आलेली नाही. आरोपीना तात्काळ अटक करून त्यांना कठोर शिक्षा द्यावी, अशी मागणी मयत मुलीचे वडील सेवानिवृत्त पोलीस अधिकारी विष्णू शिंदे यांनी पत्रकार परिषदेत केली आहे. अन्यथा दोन दिवसानंतर पुणे पोलीस अधीक्षक करायलासमोर कुटुंबासह आमरण उपोषण करून आत्मदहन करणार असल्याचा इशारा दिला आहे.

# थकीत मालमत्ता कर वसुलीसाठी महानगरपालिकेची जप्ती मोहीम नागरिकांना तातडीने कर भरण्याचे आवाहन

लातूर/ प्रतिनिधी :- मालमत्ता कर वसुली साठी महानगरपालिकेने अनेक वेळा कर सवलतीची योजना राबवली मात्र बर्याच मालमत्ता धारकांनी याकडे कानाडोळाच केला.त्या मुळे महानगरपालिकेने आता थेट धडक जप्ती मोहिमेला सुरवात केली आहे.त्याकरिता चार पथक नेमण्यात आले आहेत. लातूर शहर महानगरपालिकेमार्फत शहरातील प्रलंबित मालमत्ता कर वसुलीसाठी विशेष मोहीम सुरू करण्यात आली आहे. या मोहिमेअंतर्गत मालमत्ता कराची दीर्घकाळ थकबाकी ठेवणाऱ्या करदात्यांविरुद्ध कठोर पावले उचलून त्यांच्या मालमत्तांवर जप्ती व नळ खंडन कारवाई करण्यात येत आहे. गुरुवार अणि शुक्रवार दरम्यान (दिनांक १८ व १९) महानगरपालिकेच्या क्षेत्रीय कार्यालय सी अंतर्गत गंजगोलाई परिसरात तीन दुकाने जप्त करण्यात आले व आठ निवासी मालमत्तांचे नळ खंडन करण्यात आले तसेच क्षेत्रीय करायला ब व ड अंतर्गत प्रत्येकी एक वाणिज्य मालमत्ता जप्त करण्यात आली आहे. तसेच क्षेत्रीय कार्यालय अ अंतर्गत जप्ती मोहिमेअंतर्गत दोन लक्ष चाळीस हजार चा धनादेश प्राप्त झाले आहे. थकीत कराच्या वसुलीसाठी मनपाकडून मोहीम



राबविण्यात येत आहे. ही मोहीम अधिक तीव्र केली जाणार आहे. त्यामुळे जप्तीसारखी कटू कारवाई टाळण्यासाठी थकबाकीदारांनी कर भरून मनपाला सहकार्य करावे. असे आवाहन लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने आयुक्त श्रीमती मानसी यांनी केले आहे.

# महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या राज्यघटनेच्या व संविधानाच्या मार्गांनी ओबीसी आरक्षण मिळाले पाहिजे-प्रा.लक्ष्मण हाके

## ड. प्रकाश आंबेडकर हेच दलितांचे खरे नेते आहेत-नवनाथ वाघमारे

केज/प्रतिनिधी :- केज येथे ओबीसी आरक्षण मोर्चाचे आयोजन प्रा.लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या राज्यघटनेच्या व संविधानाच्या मार्गांनी ओबीसी आरक्षण मिळाले पाहिजे असे मत प्रा.लक्ष्मण हाके यांनी बोलताना व्यक्त केले तर ड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर हेच दलितांचे खरे नेते आहेत असे नवनाथ वाघमारे यांनी म्हटले आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, दिनांक १९ सप्टेंबर २०२५ रोजी प्रा. लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली ओबीसी आरक्षण बचाव मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. केज शहरातील जय भवानी चौक येथून मोर्चाला सुरुवात करण्यात आली. जय भवानी चौक ते मेन रोड मार्गे छत्रपती शिवाजी महाराज मार्गे उमरी रोड पंचायत समिती प्रांगणामध्ये मोर्चाचे सभेमध्ये रूपांतर होऊन मोर्चाचा समारोप करण्यात आला. यावेळी केज तालुका वंचित बहुजन आघाडीच्या वतीने शरद धीवार यांनी मनोगत व्यक्त करून वंचित बहुजन आघाडीचा ओबीसी मोर्चाला जाहीर पाठिंबा दिला. पुढे बोलताना शरद धीवार म्हणाले की, सध्या महाराष्ट्रा मध्ये जातीपातीचे राजकारण चालू असून महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रथम ओबीसी समाजासाठी कलम ३४० लागू करून व विशेष समाजांना न्याय देण्याचे काम केले. यावेळी उपस्थित ओबीसी बांधवांना मार्गदर्शन करताना नवनाथ वाघमारे यांनी म्हटले की, दलित, मुस्लिम, माळी, न्हावी समाजासह सर्व समाज बांधव हे एकत्र असताना आपल्यावर मग गुन्हे कसे होतात. छगन भुजबळ हे मोठे नेते असून त्यांचा सामाजिक व राजकीय अनुभव मोठा आहे ते ओबीसी समाजासाठी तन मनाने काम करत आहेत. यापुढे ओबीसीचा उमेदवार नसेल तर एस.सी.,एसटी उमेदवारांना मतदान करा. आम्ही छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशज जरी नसलो तरी आम्ही छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार जपण्याचे काम करत आहोत. हैदराबाद निजाम गॅजेट लागू करण्याचा अधिकार हा राज्य सरकारला नाही. ड. बाळासाहेब तथा प्रकाश आंबेडकर हेच दलितांचे खरे नेते आहेत. पंकजाताई मुंडे यांचा ओबीसी बांधवांच्या आरक्षणासाठी पाठिंबा आहे पंकजाताई या रस्त्यावरच्या लढाईसाठी सज्ज झाल्या आहेत. लवकरच मुंबईला जाण्यासाठी ओबीसी समाज बांधवांनी तयार राहावे सरकाराला चळोकी पळो सोडू, यापुढे आरक्षण वाद्यांनी आरक्षण वाद्यांनाच मतदान करायचे आहे असे बोलताना नवनाथ वाघमारे यांनी सांगितले आहे.

संविधान निर्माते महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू वंचित बहुजन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष ड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांच्या आदेशावरून केज तालुका वंचित बहुजन आघाडीच्या वतीने केज येथे झालेल्या ओबीसी आरक्षण मोर्चाला जाहीर पाठिंबा दिला आहे.



यावेळी ओबीसी आरक्षण मोर्चाचे प्रमुख मार्गदर्शक प्रा.लक्ष्मण हाके यांनी म्हटले की, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी राज्यघटना लिहिली व संविधान दिले आहे त्या संविधानाच्या मार्गाने मिळणारे आरक्षण हे ओबीसी मधूनच ओबीसी समाजाला मिळाले पाहिजे असे प्रा. लक्ष्मण हाके यांनी बोलताना स्पष्ट केले आहे. पुढे बोलताना प्रा. लक्ष्मण हाके म्हणाले की, हैदराबाद गॅजेट मुळे आमच्या ओबीसी समाजातील सात बळी गेले आहेत. या मराठा आरक्षण गॅजेट मुळे ओबीसी समाजाचे आरक्षण संपलेले आहे. यापुढे सर्व गावगाड्यातील माणस एकत्र आलेले आहेत. महात्मा फुले यांच्या पिवळ्या वादळात आत्ता निळं वादळ सामील झालेले आहे यापुढे गाव गाड्यातील अठरापगड समाज बांधव एकत्र झालेले आहेत त्यामुळे घाबरण्याचे काम नाही. हैदराबाद गॅझेट मुक्त करण्यासाठी रस्त्यावरची लढाई लढावी लागेल. आम्ही गेल्या अनेक वर्षापासून सविधानाची भाषा सांगत आहोत परंतु यांना ती मान्य नाही. देशामध्ये ओबीसीची संख्या मोठी आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी कधीच जातीपातीचे राजकारण केलेले नाही. छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेचे राजे केले आहे. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आपले एका मताला बहुमूल्य किंमत दिली आहे ती किंमत तुम्ही पैशावर विकू नका असे ओबीसी समाज बांधवांना प्रा. लक्ष्मण हाके यांनी आवाहन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, घरातील महिला या चाऱ्याच्या आणि सरपनाच्या शोधात होत्या त्यांचे डोके हे त्यामध्येच गुंतलेले होते त्यामुळे घरे होत नव्हती असे बोलताना प्रा.लक्ष्मण हाके यांनी मत व्यक्त केले. यावेळी या मोर्चामध्ये ओबीसी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE